
रायगड, नवी मुंबई
राम प्रहर
◆ वर्ष १६ ◆ अंक २२१
www.ramprahar.com
मंगळवार, २७ फेब्रुवारी २०२४ ◆ पाने ८ ◆ किंमत ₹ २



## दिघोडे खाडीपूल कोसळून दोन ठार; दोघे गंभीर

**उरण** : तालुक्यातील धुतुम-दिघोडे गावाजवळील खाडीत लहान होडीतून मासेमारीसाठी गेलेल्या आदिवासींच्या अंगावर पूल कोसळून दोन आदिवासींचा जागीच मृत्यू झाला असून, दोघे गंभीर जखमी झाल्याची दुर्घटना सोमवारी (दि. २६) सायंकाळी ७ वा. चे सुमारास घडली. धुतुम-दिघोडे गावाजवळील खाडीत आदिवासी मासेमारीसाठी गेले असता खाडीवरील काँक्रिट पूल अचानक आदिवासीच्या अंगावर कोसळला. या अपघातात अविनाश सुरेश मिरकुटे (रा. सापोली, ता.पेण), राजेश लक्ष्मण वाघमारे (रा. वरसई कटोरी ता.पेण) यांचा जागीच मृत्यू झाला, तर गुरु सदानंद कातकरी व सुरज श्याम कातकरी (रा.वेश्वी आदिवासीवाडी, उरण) हे दोघे गंभीर जखमी झाले आहेत. जखमींना ग्रामस्थ आणि पोलिसांनी तातडीने कामोठे येथील एमजीएम रुग्णालयात दाखल करण्यात आल. घटनास्थळी उरण गुन्हे पोलीस निरीक्षक सूर्यकांत कांबळे त्यांचे पथक दाखल झाले आणखी कोणी अडकले आहे का, याचा तपास करीत आहेत.

# महाराष्ट्रातील ५६ रेल्वेस्थानकांचा पुनर्विकास

## देशभरातील ५५४ स्थानके आणि १५०० उड्डाणपुलांचा कायापालट

**मुंबई : प्रतिनिधी**

भारतीय रेल्वे ही प्रवाशांच्या सुविधेसह देशातील कृषी आणि औद्योगिक क्षेत्रांच्या प्रगतीची वाहक आहे. रेल्वे यंत्रणेत अत्याधुनिक पायाभूत सुविधांच्या उभारणीसह भारतीय रेल्वेचा कायापालट होत असल्याचे प्रतिपादन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केले.



पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते दूरदृष्य प्रणालीद्वारे मध्य व पश्चिम रेल्वेच्या विविध रेल्वेस्थानके, उड्डाणपूल व अंडरपासचे भूमिपूजन व लोकार्पण, उद्घाटन कार्यक्रम सोमवारी (दि.२६) झाला. या वेळी रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव हे दूरदृष्य संवाद प्रणालीच्या माध्यमातून उपस्थित होते. देशात ४१ हजार कोटींचे रेल्वेप्रकल्प, अमृत भारत स्टेशन योजनेंतर्गत ५५४ रेल्वेस्थानकांचा पुनर्विकास, १५०० ओव्हरब्रीज आणि अंडरपासचे भूमिपूजन व लोकार्पण, उद्घाटन या वेळी करण्यात आले. यामध्ये रायगडच्या पेण तालुक्यातील कासू व पेण रेल्वेस्थानकादरम्यानच्या रोडे गावच्या हद्दीत बांधलेल्या भुयारी मार्गाचे लोकार्पण खासदार सुनील तटकरे यांच्या उपस्थितीत करण्यात आले.

### कासू-पेणदरम्यान भुयारी मार्गाचे लोकार्पण

पंतप्रधान नरेंद्र मोदी म्हणाले, देशात विविध क्षेत्रातील पायाभूत सुविधांची कामे मोठ्या प्रमाणावर व प्रचंड गतीने होत आहेत. रेल्वे यंत्रणाही वेगाने बदलत आहे. रेल्वेस्थानके अत्याधुनिक सुविधांनी युक्त करण्यासाठी अमृत भारत रेल्वेस्टेशन योजनेचा आरंभ करण्यात आला. यामुळे रेल्वेस्थानक परिसरात रोजगार निर्मितीलाही चालना मिळेल. अमृत भारत स्टेशन योजना विरासत आणि विकास या दोन्हीचे प्रतिक आहे. रेल्वेस्थानकाची उभारणी ही तेथील सांस्कृतिक, ऐतिहासिक पार्श्वभूमीवर आधारित असणार आहे. **(पान २ वर..)**

### भारतीय रेल्वे पर्यावरणपूरक होतेय -मुख्यमंत्री शिंदे

मुंबई ही देशाची आर्थिक राजधानी आहे. या महानगरातून दररोज किमान ७३ लाख प्रवासी उपनगरी रेल्वेने प्रवास करतात. एवढ्या संख्येने प्रवास करणारे प्रवासी असलेले हे एकमेव शहर आहे. मागील दहा वर्षांत रेल्वेच्या विविध यंत्रणात अभूतपूर्व बदल झाले असून रेल्वेसाठीच्या अत्याधुनिक पायाभूत सुविधांची उभारणी व प्रवाशांना सुविधा उपलब्ध करून देतानाच भारतीय रेल्वे पर्यावरणपूरक होत आहे ही अभिमानाची बाब असल्याचे प्रतिपादन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी केले.



## कामोठे कॉलनी फोरमचे पदाधिकारी भाजपमध्ये दाखल

### भाजप जनतेच्या हितासाठी लढणारा पक्ष -आमदार प्रशांत ठाकूर

**पनवेल : रामप्रहर वृत्त**


भारतीय जनता पक्ष हा जनतेच्या हितासाठी लढणारा पक्ष आहे. कार्यकर्त्यांनी जो विश्वास ठेवून भाजपमध्ये प्रवेश केला त्याचा सर्वांना अभिमान वाटेल, असा विश्वास मावळ लोकसभा मतदारसंघ प्रमुख आमदार प्रशांत ठाकूर यांनी व्यक्त केला. कामोठे शहरातील कामोठे कॉलनी फोरमचे उपाध्यक्ष डॉ. सखाराम गारळे, फोरमचे प्रमुख समन्वयक राहुल आंग्रे आणि राहुल बुधे यांच्यासह अनेक समन्वयक आणि कार्यकर्त्यांनी भाजपचे कमळ हाती घेतले आहे. या सर्व प्रवेशकर्त्यांचे आमदार प्रशांत ठाकूर आणि उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी यांनी पक्षाची शाल देऊन पक्षात स्वागत केले.

कामोठे कॉलनी फोरमचे उपाध्यक्ष डॉ. सखाराम गारळे, मुख्य समन्वयक राहुल आंग्रे आणि राहुल बुधे, तसेच रवींद्र पाढी, तुषार दळवी, चंद्रकांत यादव, प्रभाकर अडेकर, निरव नंदोला, रेणु सचदेवा, लता आनंद, नारायण चौधरी, भुषण यादव, दर्शन आनेकर, कृष्णा ननावरेमपवन तांदळेकर, तुषार मोटे, विकास बुधे, विशाल बंडगर, **(पान २ वर..)**

## बोरघाटातील तीन अपघातांत दोन ठार; १० वाहनांचे नुकसान

**खालापूर : प्रतिनिधी**

मुंबई-पुणे द्रुतगती महामार्गावर रविवारी (दि.२५) झालेल्या तीन वेगवेगळ्या अपघातात एकूण दहा वाहनांचे नुकसान झाले असून दोन जण ठार झाले आहेत.



पहिला अपघात मुंबई-पुणे द्रुतगती महामार्गावरील बोरघाटातील ढेकू गावाच्या हद्दीत झाला. मुंबई मार्गिकेवर अतिवेगात येणाऱ्या ट्रेलर (एनएल ०१ क्यू ४१७४)च्या चाकाला आग लागली. या अपघातात ट्रेलर उलटून मागे असणाऱ्या आयशर टेम्पो (एमएच ०४ जेयू ७२१३), ट्रक (एमएच ०९ ईएम ७१३२), आयशर टेम्पो (एमएच ०४ एलक्यू ७६२८), स्विफ्ट कार (एमएच ०६ बीएम १०१७), इनोवा कार (एमएच ४६ झेड ८११८), फॉर्च्युनर (एमएच ४३ आर ७१७१) या सहा वाहनांना धडकला.

या अपघातात स्विफ्ट कारमधील महिला जखमी झाली. या अपघातामुळे अर्धा तास वाहतूक ठप्प झाली होती. अपघातानंतर देवदूत टीमच्या मदतीने विझवून ट्रेलर रोडच्या बाजूला करून वाहतूक सुरळीत करण्यात आली. **(पान २ वर..)**

## प्रसिद्ध गझल गायक पंकज उधास यांचे निधन



**मुंबई : प्रतिनिधी**

आपल्या जादुई आवाजाने रसिकांच्या मनावर मोहिनी घालणाऱ्या आणि विविध गझल गाणाऱ्या गायक पंकज उधास यांचे निधन वयाच्या ७२व्या वर्षी सोमवारी (दि.२६) निधन झाले. त्यांच्या निधनाची माहिती त्यांच्या कुटुंबीयांनी दिली आहे.

'चिठ्ठी आयी है..' ही त्यांची गझल अजरामर होती. गेल्या काही दिवसांपासून त्यांना आजाराने ग्रासले होते, मात्र सोमवारी त्यांची मृत्यूशी झुंज अपयशी ठरली. पंकज यांच्या कन्या नायाब उधास यांनी वडिलांच्या मृत्यूची बातमी पोस्ट केली आहे. मागच्या १० दिवसांपासून त्यांच्यावर ब्रिचकँडी रुग्णालयात उपचार सुरू होते. पंकज उधास यांच्या पार्थिवावर मंगळवारी (दि. २७) अंत्यसंस्कार करण्यात येणार आहेत.



### अभिवादन

**मुंबई : राष्ट्रभक्त, स्वातंत्र्यवीर विनायक दामोदर सावरकर यांच्या पुण्यतिथीनिमित्त आमदार प्रशांत ठाकूर, आमदार महेश बालदी यांनी विधानभवनात सावरकर यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले.**



# पंतप्रधान मोदींच्या नेतृत्वाखाली प्रवासी सुविधा पायाभूत होतायेत

## खासदार सुनील तटकरे यांचे प्रतिपादन

**पेण : प्रतिनिधी**

देशभरात रेल्वेमार्ग, राष्ट्रीय महामार्ग, हवाईमार्ग या सारख्या प्रवासी सुविधा पायाभूत निर्माण करून त्यांना प्राधान्य देण्याचे काम पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वखाली करण्यात येत असल्याचे प्रतिपादन खासदार सुनिल तटकरे यांनी पेण येथे केले.

अमृत भारत स्टेशन योजनेंतर्गत संपूर्ण देशभरात ५५३ रेल्वेस्थानक पुनर्विकास, पुनर्विकसित गोमती नगर रेल्वे स्टेशन आणि १५०० रेल्वे उड्डाणपूल व भुयारी मार्ग पायाभरणी व उदघाट्न व पुनर्विकास कार्यक्रम पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते ऑनलाईन पद्धतीने करण्यात आले. यावेळी कासू व पेण रेल्वेस्थानकाच्या मधील रोडे गावच्या हद्दीत बांधलेल्या भुयारी मार्गाचे लोकार्पण खासदार सुनील तटकरे यांच्या उपस्थितीत करण्यात आले.

या वेळी विभागीय अभियंता योगेंद्र प्रसाद सिंग, सहाय्यक व्यवस्थापक सुनील शिंदे, सहाय्यक मंडळ अभियंता प्रमोद वाडेकर, वरिष्ठ विभागीय अभियंता संजीवकुमार,



(छाया : इजाज मनियार)

समन्वयक आनंद प्रकाश मीना, राष्ट्रवादी काँग्रेस तालुकाध्यक्ष दयानंद भगत, अँड. मंगेश नेने, महिला तालुकाध्यक्ष चैताली पाटील, शहर अध्यक्षा सूचिता चव्हाण, जिल्हा उपाध्यक्ष झैन नाईक, कांदळे सरपंच मुरलीधर भोईर, अनिल म्हात्रे, माजी सरपंच शरद पाटील, सुनील गायकर, माजी उपनगराध्यक्ष दीपक गुरव, योगेश पाटील, परशुराम मोकल, स्वप्नील म्हात्रे, अँड. विकास म्हात्रे, गंगाधर पाटील, विकास पाटील आदी उपस्थित होते.

या वेळी बोलताना खासदार सुनिल तटकरे यांनी सांगितले कि, देशभरात रेल्वेचे जाळे निर्माण करण्याचे काम केंद्र सरकारच्या माध्यमातून करण्यात येत असून यामुळे दळण वळण सुविधा वाढविण्याचे काम होत आहे. मध्य रेल्वे, दक्षिण रेल्वे, हार्बर रेल्वे, कोकण रेल्वे सारख्या सुविधा आपल्या भागात मिळत असून अनेक ठिकाणी राष्ट्रीय महामार्गालागत सुद्धा रेल्वे सुविधा उपलब्ध होत असून यासाठी ओव्हर ब्रिज, भुयारी मार्ग बांधण्याचे कामाला प्राधान्य देण्याचे काम पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या मार्गदर्शनाखाली होत आहे. कोकणातील हवामानाच्या दृष्टीने बांधण्यात येणाऱ्या रेल्वे बायपास किंवा भुयारी मार्गात पाणी साठण्याचे प्रकार होऊ नये यासाठी रेल्वे अधिकाऱ्यांनी ग्रामस्थांच्या मागण्या व सूचनाही लक्षात घेतल्या पाहिजेत.

रायगडचा एक प्रतिनिधी म्हणून पंतप्रधान नरेंद्र मोदी, केंद्रीय रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव, केंद्रीय रेल्वे राज्यमंत्री रावसाहेब दानवे यांचे खासदार सुनिल तटकरे यांनी या वेळी आभार मानले.

या वेळी खासदार सुनिल तटकरे यांच्या हस्ते रोडे गावातील भुयारी मार्गाचे उदघाट्न करण्यात आले. विविध सांस्कृतिक कार्यक्रम, लोकनृत्य व गायनाचे कार्यक्रमाचे आयोजन रेल्वे प्रशासन मार्फत करण्यात आले होते. या वेळी शालेय विद्यार्थ्यांनीदेखील या कार्यक्रमाला उपस्थिती लावली होती.

## विविध शासकीय योजनांच्या ऑनलाईन अर्जांबाबत आवाहन

**रायगड : रामप्रहर वृत्त**

मातंग समाज व तत्सम १२ पोटजातीतील गरजू व होतकरु लोकांनी सुविधा कर्ज योजना, महिला समृध्दी योजना, शैक्षणिक कार्य योजना या कर्ज योजनांचे लाभ घेण्यासाठी २६ फेब्रुवारी ते २६ मार्च २०२४ या कालावधीत ऑनलाईन पध्दतीने https://beta.slasdc.org या बेवसाईट सादर करावेत, असे आवाहन जिल्हा व्यवस्थापक साहित्यरत्न लोकशाहीर अण्णा भाऊ साठे विकास महामंडळ (मर्या.), जिल्हा कार्यालय रायगड अंगद कांबळे यांनी केले आहे.

साहित्यरत्न लोकशाहीर अण्णा भाऊ साठे विकास महामंडळामार्फत मांग, मातंग मिनी–मादीम दानखणी माग, मांग महाशी, मदारी, राधेमांग, मांग गारुडी, मांग गोराडी, मादगी व मादिगा या जातीतील दरिद्रय रेषेखालील व गरजू घटकांचा आर्थिक उन्नतीसाठी तसेच त्यांना स्वंयरोजगाराच्या अधिअधिक संधी उपलब्ध करुन देण्याच्या उद्देशाने सामजिक न्याय विभागांतर्गत महामंडळाची स्थापना ११ जुलै १९८५ रोजी करण्यात आली आहे. अनुसूचित जातीमध्ये मातंग समाज व तत्सम १२ पोटजातीतील लोक संख्येने मोठ्या प्रमाणात असलेल्या लोकांमध्ये शिक्षणाच्या प्रमाणात लक्षणीय वाढ झाली आहे, परंतु उत्पन्नाच्या साधनाच्या अभावामुळे आर्थिक परिस्थिती बेताची आहे. मातंग समाज व तत्सम १२ पोटजातीचा आर्थिक, शैक्षणिक, सामाजिक विकास होण्याच्या दृष्टीने आवश्यक असलेल्या कर्ज योजना/उपक्रम राबवून त्यांना द्ररिदय रेषेच्यावर आणणे हा महामंडळाच्या स्थापनेचा उद्देश आहे.

सर्व परिस्थितीचा विचार करुन साहित्यरत्न लोकशाहीर अण्णा भाऊ साठे विकास महामंडळ (मर्या.), मुंबई व राष्ट्रीय अनुसूचित जाती वित्त विकास महामंडळ, दिल्ली यांच्यामार्फत सुविधा कर्ज योजना कर्ज मर्यादा रक्कम पाच लाख रुपये, महिला समृध्दी योजना–कर्ज मर्यादा–एक लाख ४० हजार, शैक्षणिक कर्ज योजना कर्ज मर्यादा देशांर्तगत अभ्यासक्रमासाठी रक्कम ३० लाख रुपये व परदेशातील अभ्यासक्रमासाठी रक्कम ४० लाख रुपये याप्रमाणे योजना सुरू करण्यात आल्या आहेत. अर्जदारांना महामंडळामार्फत वेबसाईट प्रणाली विकसित करण्यात आली असून या योजनांचे अर्ज ऑनलाईन पध्दतीने https://beta.slasde.org या वेबसाईट प्रणालीवर सादर करावयाचे आहेत.

## अनधिकृत बांधकामावर कारवाई

**उरण : प्रतिनिधी**

सिडकोच्या अनधिकृत बांधकाम विभागाने सोमवारी (दि. २६) उरण पनवेल मार्गावरील बोकडविरा चारफाटा ते कोटनाका,उरण रेल्वे स्थानकाच्या दरम्यानच्या ६५ बांधकामावर कारवाई केली. यासाठी कडक पोलीस बंदोबस्त ठेवण्यात आला आहे.

दोन जेसीबी आणि सिडकोच्या सुरक्षा रक्षकांसह ही कारवाई करण्यात आली. यामध्ये पत्रा, पक्के बांधकाम तसेच टपऱ्यावरही कारवाई करण्यात आली. अनेक ठिकाणी स्थानिकांनी सिडकोच्या कारवाईला विरोध करण्याचा प्रयत्न केला तर, अनेकांनी स्वतःहून आपली बांधकामे खाली केली.

यामध्ये सिडको व्यतिरिक्त बांधकाम असलेल्या शेतकऱ्यांनी न्यायालयातून स्टे ऑर्डर आल्याने त्यांच्या आशा बांधकामावरील कारवाई पुढे ढकलण्यात आली आहे. सिडकोच्या जागेत असलेल्या अनधिकृत बांधकामावर कारवाई करीत असल्याची माहिती सिडकोच्या अधिकाऱ्यांनी दिली आहे.



## पनवेल महापालिकेतर्फे भटक्या श्वानांचे रेबीज लसीकरण सुरू

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

रेबीज हा अतिघातक संसर्गजन्य रोग आहे. या रोगापासून वाचण्यासाठी पनवेल महापालिकेच्या वतीने 'अँटी रेबीज कॅम्पेन' २६ फेब्रुवारी ते १ मार्च या दरम्यान राबविण्यात येणार आहे. या मोहिमे अंतर्गत सुमारे ५०० भटक्या श्वानांना रेबीजची लस देण्यात येणार आहे. या मोहिमेचे उद्घाटन सोमवारी (दि. २६) नवीन पनवेल येथील महापालिकेच्या श्वान निर्बीजीकरण केंद्रामध्ये आयुक्त गणेश देशमुख, मुख्य वैद्यकिय आरोग्य अधिकारी डॉ.आनंद गोसावी, मिशन रेबीज संस्थेचे संचालक डॉ.बालाजी, मिशन रेबीजच्या युनाटेड किंग्डमच्या प्रतिनिधी डॉ.एमा यांच्या हस्ते करण्यात आले.



या वेळी पशुवैद्यकिय अधिकारी डॉ. भगवान गीते, साथरोग वैद्यकिय अधिकारी डॉ. आकाश ठसळे, वैद्यकिय अधिकारी डॉ.मनिषा चांडक, डॉ. भक्तराज भोइटे, डॉ. सुरेश पंडित, डॉ.अमेय तांडेल, महापालिका अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते. आज मान्यवरांच्या हस्ते झेंडा दाखवून, श्वानांचा लस देऊन मोहीमेची सुरूवात करण्यात आली.

एकदा रेबीज श्वान चावल्यावर त्यावर कुठलाही उपाय नाही. ज्या व्यक्तीला श्वान चावल्यावर त्याला रेबीज झाल्यावर त्याचा मृत्यू होतो. त्यामुळे त्यासाठी मनुष्याप्रमाणे श्वानांना अँटीरेबीज लसीकरण करणे हा एकमेव उपाय आहे. आपल्या भारत देशाने नॅशनल क्शन प्लॉन फॉर डॉग मेडिकेटेड रेबीज इलिमेशन फ्रॅाम इंडिया बाय २०३० हा कार्यक्रम राबवित आहे, या शासनाच्या कार्यक्रमाच्या धरतीवर पनवेल महानगरपालिकेने रेबीजचे समूळ उच्चाटन करण्यासाठी पनवेल महानगरपालिका हद्दीमध्ये 'अँटी रेबीज कॅम्पेन' कार्यक्रम २६ फेब्रुवारी ते १ मार्च पर्यंत राबविण्यात येणार आहे.

पनवेल महापालिका 'मिशन रेबीज' ह्या एनजीओ सोबत मोफत रेबीज लसीकरण हा कार्यक्रम राबविणार आहे. महापालिका क्षेत्रातील ५०० भटक्या श्वानांना यांनाचे लसीकरण करण्यात येणार आहे, हि मोहीम ५ दिवस पनवेल मध्ये चालणार आहे, व रेबीज संदर्भात पुढील वाटचालीकरिता महापालिकेस मिशन रेबीज ही संस्था तांत्रिक मदत करणार आहे. रेबीज मुक्त पनवेल अंतर्गत श्वांनाच्या कपाळावर विशिष्ट रंगाची खूण करण्यात येणार आहे, जेणे करून रेबीज लसीकरण झालेल्या श्वानांची ओळख पटेल. तसेच या भटक्या श्वानांची गणना महापालिकेच्या वतीने केली जाणार आहे.

## प्रबोधनकार ठाकरे मार्ग फलकाचे अनावरण

**पनवेल : वार्ताहर**

पनवेल शहरातील सामाजिक कार्यात अग्रेसर असणाऱ्या शिवशक्ती मित्र मंडळाच्या माध्यमातून व यासाठी पनवेल महानगरपालिकडे सातत्याने पाठपुरावा करणारे माजी नगरसेवक व शिवशक्ती मित्र मंडळाचे संस्थापक रमेश गुडेकर यांच्या प्रयत्नांमुळे उभारण्यात आलेल्या पनवेल महापालिका प्रबोधनकार ठाकरे मार्ग फलकाचे अनावरण शिवसेना माजी जिल्हाप्रमुख माधव भिडे यांच्या हस्ते करण्यात आले. या कामासाठी माजी नगरसेवक राजू सोनी यांचे विशेष सहकार्य लाभले आहे.

या वेळी माजी नगरसेवक रमेश गुडेकर, मंडळाचे अध्यक्ष गौरव वेदक,





उपाध्यक्ष संजय पाटील व इतर सदस्य व पदाधिकारी उपस्थित होते. या वेळी माधव भिडे यांनी सांगितले की, या फलकाचे अनावरण माझ्या हस्ते करण्यात येत आहे हे मी माझे भाग्य समजतो. शिवसेना प्रमुख बाळासाहेब ठाकरे यांच्या खांद्याला खांदा लावून रायगड जिल्ह्यात व पनवेल तालुक्यात पक्ष वाढीसाठी काम केले आहे. त्यामुळे आज जिल्ह्यात शिवसेनेची एक मोठी ताकद व फळी उभी राहिली आहे. तर माजी नगरसेवक रमेश गुडेकर म्हणाले की, पनवेल महापालिकेकडे पाठपुरावाद यासाठी बजेटमध्ये पनवेल नगर परिषदेच्या माजी नगराध्यक्ष चारुशीला घरत यांच्याकडे बाळासाहेब ठाकरे यांचे सुंदर स्मारक व्हावे यासाठी एक कोटींची तरतूद त्यावेळी करून ठेवली आहे. तसेच शहरातील महापुरुषांच्या भव्य कमानी व त्यांचे नाव रस्त्यांना देण्यात यावे साठी पाठपुरावा केला होता. त्यामुळेच चार ठिकाणी या कमानी मंजूर करण्याचे आश्वासन त्यावेळी दिले होते. या फलकाचे अनावरण करताना अत्यानंद होत असल्याचे सांगितले.

## 'सीकेटी'च्या 'काक्षी'ला झी नाट्यगौरव प्रायोगिक रंगभूमी पुरस्कारासाठी नामांकन

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

झी मराठी आयोजित झी नाट्यगौरव हा पुरस्कार सोहळा प्रायोगिक आणि व्यावसायिक रंगभूमीसाठी गेली अनेक वर्ष देण्यात येत आहे. नाट्य क्षेत्रात मानाच्या समजल्या जाणाऱ्या या सोहळ्यामध्ये यावर्षी खांदा कॉलनीमधील सीकेटी स्वायत्त महाविद्यालयाचे दोन अंकी नाटक काक्षी याची निवड नामांकन सोहळ्यासाठी झाली आहे. महाराष्ट्रामधील १० टॉप च्या नाटकांची निवड यावर्षी नामांकनसाठी करण्यात आली आहे.

जी. ए. कुलकर्णी यांच्या जन्मशताब्दी वर्षानिमित्त त्यांच्या कळसूत्र या कादंबरीवर हे नाटक सादर करण्यात आले आहे या नाटकाचे नाट्यरूपांतर अनिकेत बोले यांनी केले असून त्याचे दिग्दर्शन अभिजित झुंजारराव यांनी केले आहे. मराठी भाषा दिनाचे औचित्य साधून काक्षी या नाटकाचा प्रयोग २७ फेब्रुवारी २०२४ रोजी संध्याकाळी ६ वाजता, आद्य क्रांतिवीर वासुदेव बळवंत फडके नाट्यगृह पनवेल येथे सादर केले जाणार असून, प्रस्तुत नाटकाच्या




प्रयोगासाठी झी नाट्यगौरव ची टिम नामांकन देण्यासाठी उपस्थित राहणार आहे.

नाटकाच्या यशस्वी प्रयोगासाठी जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे चेअरमन माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, अध्यक्ष अरुणशेठ भगत, व्हॉइस चेअरमन वाय. टी. देशमुख आणि सर्व पदाधिकारी तसेच सीकेटी महाविद्यालयाचे प्राचार्य प्रो. डॉ. एस. के. पाटील यांनी शुभेच्छा दिल्या आहेत.

पान १ वरुन

### महाराष्ट्रातील ५६ रेल्वेस्थानकांचा पुनर्विकास

या स्थानकांमध्ये दिव्यांग आणि वरिष्ठ नागरिकांसाठी विशेष सुविधा असणार आहेत. रेल्वेचे मोठ्या प्रमाणावर विद्युतीकरण करण्यात येत आहे. रेल्वेस्थानकावरील स्वच्छता हे आज वैशिष्ठ्य झाले आहे. भारतीय रेल्वे देशवासीयांसाठी 'ईज ऑल ट्रॅव्हल' झाले आहे. भारतीय रेल्वे विभागाच्या अत्याधुनिकीकरणासाठी भरीव निधी उपलब्ध करुन दिला जात आहे. वन नेशन वन प्रॉडक्ट ही योजनाही रोजगार निर्मितीला चालना देणार ठरत असल्याचे प्रधानमंत्री मोदी यांनी सांगितले.

महाराष्ट्रातील रेल्वे पायाभूत सुविधांमध्ये सुधारणा करण्यासाठी भारतीय रेल्वेकडून मोठी मदत होत आहे. सध्या राज्यात २२७४ कोटी रुपयांपेक्षा जास्त किमतीचे अमृत भारत स्टेशन, रोड ओव्हरब्रीज आणि अंडरपास असे २४१ रेल्वे प्रकल्प प्रगतीपथावर आहेत. यावर्षीच्या अर्थसंकल्पात महाराष्ट्रासाठी १५ हजार ५५४ कोटी रुपयांची विक्रमी तरतूद करण्यात आली आहे. महाराष्ट्रातील ५६ स्थानके जागतिक दर्जाची रेल्वे स्थानके म्हणून विकसित करण्यात येणार आहेत.

**देशात रेल्वे मार्गाच्या जाळ्याचे विस्तारीकरण –रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव**

*रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव म्हणाले, रेल्वे स्थानकांच्या अत्याधुनिकीकरणाचे मोठे प्रकल्प हाती घेण्यात आले आहेत. देशात जम्मू काश्मीर आणि पूर्वोत्तर राज्यांसह रेल्वे मार्गाचे जाळे विस्तारले जात आहे. वंदे भारत रेल्वे वैशिष्ठ्यपूर्ण ठरली असून काही दिवसात जागतिक मानकांच्या पूर्ततेनंतर या प्रणालीच्या निर्यातीसंदर्भातही विचार करण्यात येत आहे. अमृत भारत रेल्वेही यशस्वी ठरली आहे. भारतीय रेल्वे पर्यावरणपूरक होत असल्याचेही वैष्णव यांनी सांगितले.*

### कामोठे कॉलनी फोरमचे पदाधिकारी भाजपमध्ये दाखल

प्रसाद जगदाळे, पी. के. वर्षा, रघुवीर खंडुरी, दिलीपकुमार नेहरू, आर. सी. शर्मा, अक्षय पोकळे, राम चव्हाण, विजय मोहोद, जालिंदर सुंबरे, आदर्श तळे यांनी शेकडो समर्थकांसह भाजपमध्ये जाहीर प्रवेश केला.

या वेळी डॉ. सखाराम गराळे म्हणाले की, काही लोक भाजपच्या विकास आणि धोरणांच्या विरोधात अजेंडा चालवत होते. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या दूरदृष्टी आणि नेतृत्वाखाली सबका साथ, सबका विकास हे मिशन पूर्ण होत आहे. मी राजकारण नाही तर सामाजिक उन्नती आणि लोकांच्या समस्या सोडवण्यासाठी कॉलनी फोरमच्या स्थापनेसोबत होतो, मात्र काही मुद्द्यांवर फोरममध्ये राजकारण सुरू झाले आणि ते योग्य नव्हते. त्यामुळे फोरमला सोडत भाजपला पाठिंबा देण्याचा निर्णय घेण्यात आला, असे सांगतानाच आमदार प्रशांत ठाकूर यांच्या नेतृत्वाखाली जनतेला न्याय देण्यात यशस्वी होईल, असा विश्वास डॉ. गारळे यांनी व्यक्त केला.

पक्षप्रवेश सोहळ्यास भाजपचे पनवेल शहर अध्यक्ष अनिल भगत, उत्तर रायगड जिल्हा सरचिटणीस नितीन पाटील, कामोठे शहर अध्यक्ष रवींद्र जोशी, माजी नगरसेवक अरुणकुमार भगत, हरेश केणी, बबन मुकादम, विजय चिपळेकर, विकास घरत, माजी नगरसेविका मोनिका महानवर, हेमलता गोवारी, कुसूम म्हात्रे, आबासाहेब गलंडे, ओबीसी मोर्चा जिल्हाध्यक्ष राजेश गायकर, प्रदीप भगत, भाऊ भगत, भटके विमुक्त आघाडीच्या महिलाध्यक्ष विद्या तामखेडे, महिला मोर्चा कामोठे शहराध्यक्ष वनिता पाटील, कामोठे सरचिटणीस हर्षवर्धन पाटील, युवामोर्चा कामोठे शहराध्यक्ष तेजस जाधव यांच्यासह इतर पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

### बोरघाटात तीन अपघातात दोघे ठार; १० वाहनांचे नुकसान


दुसरा अपघात ढेकू गावाच्या हद्दीत रात्री १० वा. सुमारास झाला. कारचालक हरी पवार (३०, रा. रावेत पुणे) याने उतारावर कारचा वेग अचानक कमी केला. त्यामुळे त्याच्या पाठीमागे असणारी तीन वाहने एकमेकांवर आदळली. या अपघातात मनिष ताम्हणकर (४८, रा. डोंबिवली) हे ठार झाले.

तिसरा अपघात बोरघाटात ढेकू गावाच्या हद्दीत अज्ञात वाहनाने लालू कुमार सिंग (२९, रामदेवी बिहार, सध्या अफकॉन कं. कामगार ढेकू) यास ढोकर मारून पलायन केले. यामध्ये लालू सिंग जागीच ठार झाला.

## सिडको उपाध्यक्षांकडून प्रकल्प आढावा व सूचना

**नवी मुंबई : सिडको वृत्तसेवा**

शहर आणि औद्योगिक विकास महामंडळ अर्थात सिडकोचे उपाध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक






विजय सिंघल यांनी सोमवारी (दि. २६) सिडकोच्या सर्व महत्त्वाच्या प्रकल्पांचा आढावा घेऊन सर्व प्रकल्प जलदगतीने पूर्ण करण्याच्या सूचना संबंधित विभागप्रमुख आणि अधिकाऱ्यांना दिल्या.

या बैठकीसाठी सहव्यवस्थापकीय संचालक शान्तनू गोयल, सहव्यवस्थापकीय संचालक डॉ. कैलास शिंदे व सहव्यवस्थापकीय संचालक दिलीप ढोले उपस्थित होते.

### दुखवटा

## बाळकृष्ण मेथा

**माणगाव : प्रतिनिधी**

माणगाव येथील वृत्तपत्र विक्रेते कै. बाळकृष्ण लालजी मेथा (वय ८६) यांचे सोमवारी (दि. २६) सिद्धीनगर माणगाव येथे निधन झाले. त्यांच्या पश्चात पत्नी एक मुलगा, तीन मुली, सून, जावई, नातवंडे, असा मोठा परिवार आहे.



बाळकृष्ण मेथा यांच्या निधनाची माहिती समजताच त्यांचे चाहते मित्रपरिवार व नातेवाईक यांनी त्यांच्या सिद्धिनगर माणगाव येथील निवासस्थानी येऊन अंत्यदर्शन घेतले. मंगळवारी (दि. २७) माणगाव येथील स्मशानभूमीत सकाळी ८.३० वाजता अंत्यसंस्कार करण्यात येणार आहेत.

## निवडक

### डंपरमधील दोन बॅटऱ्यांची चोरी

**पनवेल :** करंजाडे येथे उभ्या करून ठेवलेल्या डंपरमधील सिमरन कंपनीच्या दोन बॅटऱ्यांची चोरी अज्ञात चोरट्याने केल्याची घटना घडली आहे. जगदीश केणी यांच्या राहत्या घराच्या बाजूस त्यांच्या मालकीच्या डम्परमधील १० हजार रुपये किमतीच्या आणि १२ वॅटच्या दोन सिमरन कंपनीच्या बॅटरी अज्ञात चोरट्याने चोरून नेल्याने याबाबतची तक्रार पनवेल शहर पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे.

### गांजा विक्री करणारा गजाआड

**पनवेल :** उलवे नोडमधील बहाळगाव तलावाजवळ गांजा विक्रीसाठी आलेल्या व्यक्तीला एनआरआय पोलिसांनी अटक केली. के. आर. जेम्स (वय ६०) असे या व्यक्तीचे नाव असून, पोलिसांनी त्याच्याजवळ असलेला सुमारे १८ हजार रुपये किमतीचा एक किलो ११० ग्रॅम गांजा जप्त केला. या व्यक्तीने हा गांजा कुठून आणला याबाबत पोलिसांकडून अधिक तपास करण्यात येत आहे. एनआरआय पोलीस ठाण्यातील महिला पोलीस उपनिरीक्षक वऱ्हाडी व त्यांचे पथक रात्री उलवे नोडमध्ये घालत होते. दरम्यान, जळगाव तलावाजवळ के. आर. जेम्स ही व्यक्ती हातामध्ये पिशवी घेऊन संशयास्पदरीत्या फिरताना त्यांच्या निदर्शनास आली. त्यावर पोलिसांनी त्याची चौकशी सुरू केली असता, त्याने तेथून पळून जाण्याचा प्रयत्न केला.

# मालमत्ता कर थकबाकीदारांना जप्तीपूर्व नोटीस

## पनवेल महापालिकेतर्फे चारही प्रभागामध्ये कारवाई

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

महापालिकेचा मालमत्ता कर न भरलेल्या थकबाकीदारांना जप्तीपूर्व नोटीसा बजावण्यास पालिकेने सुरूवात केली आहे. आयुक्त गणेश देशमुख यांच्या सूचनेनूसार मालमत्ता कर विभागाच्या जप्ती पथकाच्या कर्मचाऱ्यांनी सोमवारी (दि. २६) चारही प्रभागामध्ये ४८ जप्तीपूर्व नोटीसांचे वाटप केले.



महापालिका क्षेत्रातील चारही प्रभागामधील सुमारे तीन लाख ५० हजार मालमत्तांना कराची आकारणी करण्यात आली आहे. यातील ७७ हजार मालमत्ताधारकांनी आपला मालमत्ताकर भरला आहे. उर्वरित दोन लाख ८० हजार मालमत्ताधारकांनी आपला मालमत्ता कर भरला नाही. सध्याच्या आर्थिक वर्षामध्ये १७ एप्रिलपासून आजपर्यंत २६१ कोटी इतकी वसुली झाली आहे.

आजवर महापालिकेने सातत्याने नागरिकांना सवलती देऊन मालमत्ता कर भरण्याबाबत आवाहन केले आहे. परंतू आता महापालिकेने थकबाकीदारांच्या विरोधात कठोर पावले उचलण्यास सुरुवात केली आहे. ज्या थकबाकीदारांचा खूप जास्त मालमत्ता कर भरावयाचा राहीला अशा सुमारे १०१ औद्योगिक, १०७अनिवासी, १००निवासी थकबाकीदारांची यादी आज १० दैनिकांमध्ये प्रसिध्द केली आहे. या मालमत्ताधारकांना जप्ती नोटीसा देण्याचे काम वेगाने सुरू आहे. आज अखेर चारही प्रभागांमध्ये ४८ जप्तीपूर्व नोटीसा देण्यात आल्या आहेत. यामध्ये खारघरमध्ये आठ अनिवासी थकबाकीदारांना नोटीसा देण्यात आल्या. कामोठेमध्ये २ औद्योगिक व आठ निवासी थकबाकीदारांना नोटीसा देण्यात आल्या. नवीन पनवेल व खांदा कॉलनीमध्ये २४ थकबाकीदारांना नोटीसा देण्यात आल्या. एमआयडीसी भागामध्ये सहा थकबाकीदारांना नोटीसा देण्यात आल्या. या थकबाकीदारांना येत्या सात दिवसांची मुदत देण्यात आली आहे. त्यानंतर महापालिकेच्या चारही प्रभाग अधिकाऱ्यांच्या मार्फत वॉरंट काढण्यात येणार आहे.

महाराष्ट्र महापालिका अधिनियम कलम १२८ व अनुसूची ड प्रकरण ८ कराधान नियम ४७ अन्वये महानगरपालिकेस देय असलेल्या कराच्या थकबाकी पोटी जंगम स्थावर मालमत्ता जप्त अथवा अटकावणी करुन जाहिर लिलावाने विक्री करून थकबाकी वसूल करणेची तरतूद महानगरपालिकेस आहे. मालमत्ता धारकांनी महापालिकेचा मालमत्ता कर भरावा यासाठी महापालिकेने सातत्याने विविध सवलती दिल्या होत्या.

मालमत्ता कर न भरल्यास त्याच्या शास्तीमध्ये प्रतिमहा दोन टक्क्यांची वाढ होत असल्याने नागरिकांनी आपला मालमत्ता कर भरावा, असे आवाहन सातत्याने रिक्षामधून लाऊड स्पीकरच्या माध्यमातून केले जात आहे.

### पथकाच्या कर्मचाऱ्यांमध्ये वाढ

*महापालिका महापालिकेच्या सर्व प्रस्तावित कामांसाठी मालमत्ता कर हा प्रमुख स्त्रोत आहे. अखेर मालमत्ता कर वसुलीसाठी महापालिकेने मालमत्ताधारकांना वसुलीच्या नोटीस दिल्यानंतर आता जप्ती नोटीसा देण्यास सुरूवात केली आहे. यासाठी मालमत्ता कर विभागाच्या जप्ती पथकाच्या कर्मचाऱ्यांमध्ये वाढ करण्यात आली आहे. या कर्मचाऱ्यांच्या माध्यमातून निवासी, अनिवासी, औद्योगिक थकीत मालमत्ताधारकांना जप्ती नोटीसा पाठविण्याचे काम सुरू झाले आहे. मालमत्ताधारकांना काही शंका असल्यास १८००-५३२०-३४० टोल फ्री क्रमांवरती संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.*



**कामोठे : येथे आमदार प्रशांत ठाकूर यांच्या नेतृत्वावर विश्वास ठेऊन कॉलनी फोरमचे उपाध्यक्ष डॉ. सखाराम गारळे, मुख्य समन्वयक राहुल आंग्रे आणि राहुल बुधे यांच्यासह शेकडो समर्थकांसह संघटनेला रामराम ठोकत भाजपमध्ये प्रवेश केला. रविवारी झालेल्या पक्षप्रवेश कार्यक्रमानंतर त्यांनी माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांची सदीच्छा भेट घेतली. या वेळी भाजप शहराध्यक्ष रवींद्र जोशी, युवा मोर्चा अध्यक्ष तेजस जाधव, ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते रावसाहेब बुधे, नानासाहेब मगदूम, नानासाहेब बुधे, देवेंद्र घुटुकडे, सत्यम बुधे आदी उपस्थित होते.**



**पनवेल : भाजप तालुका चिटणीस सुनील पुंडलिक शेळके यांना वाढदिवसानिमित्त भाजप तालुकाध्यक्ष अरुणशेठ भगत यांनी शुभेच्छा दिल्या. या वेळी माजी पंचायत समिती सदस्य भूपेंद्र पाटील, अमर शेळके, संतोष शेळके उपस्थित होते.**

## खांदा कॉलनीत हळदीकुंकू समारंभ

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

महाराष्ट्रामध्ये रथसप्तमीपर्यंत हळदीकुंकू समारंभाचे आयोजन करून विवाहित महिला एकत्र येऊन मोठ्या उत्साहात हळदी कुंकू समारंभ साजरा करतात. याअंतर्गत भारतीय जनता पार्टी महिला मोर्चा आणि पनवेल महानगर पालिकेचे माजी नगरसेवक एकनाथ गायकवाड यांच्या वतीने हळदीकुंकू समारंभाचे आयोजन करण्यात आले होते.



हा समारंभ खांदा कॉलनी सेक्टर ६ येथे करण्यात आले होते. या वेळी शकुंतला रामशेठ ठाकूर, अर्चना परेश ठाकूर, माजी महापौर कविता चौतमोल, पनवेल महिला मोर्चा अध्यक्ष राजश्री वावेकर, प्रेमा भोपी, पनवेल महिला मोर्चा चिटणीस आशा मुंडे, मालिका गायकवाड, प्रतिभा भोईर, मंदा भगत, भोसले ताई, प्रभाग अध्यक्ष शांताराम महाडिक गोपीनाथ मुंडे, ओबीसी सेलचे रामनाथ पाटील, खांदा कॉलनी उपाध्यक्ष सचिन गायकवाड, ज्येष्ठ नेते दत्तात्रेय खंडागळे, भाजप युवा नेते अविनाश गायकवाड, विनोद काकडे, संतोष लोटणकर, युवराज बेडसे, अंकुश खरमाटे यांच्यासह इतर मान्यवर आणि पदाधिकारी उपस्थित होते.

## स्वातंत्र्यवीर विनायक दामोदर सावरकरांच्या स्मृतिदिनानिमित्त पनवेलमध्ये आदरांजली

**पनवेल : वार्ताहर**

भारतीय स्वतंत्र लढ्यातील आघाडीचे नेते स्वातंत्र्यवीर विनायक दामोदर सावरकर यांच्या स्मृतिदिनानिमित्त पनवेल येथील सावकर चौक येथे अनेकांनी त्यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले.

या वेळी भारतीय जनता पक्षाचे उत्तर रायगड जिल्हा अध्यक्ष अविनाश कोळी यांनी स्वातंत्र्यवीर विनायक दामोदर सावरकर यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. या कार्यकमाचे आयोजन केशवस्मृती पतपेढीच्यावतीने आयोजन करण्यात आले होते.



या वेळी जिल्हा सरचिटणीस नितीन पाटील, केशवस्मृती पतपेढी चेअरमन अमित ओझे, अधिकारी सुनील भगत, महेंद्र गोडबोले, पतसंस्था संचालिका संगीता परदेशी, पतसंस्थेचे माजी उपाध्यक्ष संजय गुरुजी, सामाजिक कार्यकर्त्या माधुरी गोसावी, सुशांत पाटणकर, तेजस वाडकर, सोनाली शेट्टे, सुषमा भिडे, पत्रकार संजय कदम, नितीन कोळी, विशाल सावंत, हेमंत माने, हेमंत सोनावणे, परेश बोरकर आदी पदाधिकारी उपस्थित होते.

सावरकरांचे विचार हे अत्यंत प्रेरणादायी आणि जाज्वल्य होते. हिंदू समाज एकजीव आणि संघटित करण्यासाठी सावरकरांनी केलेल कार्य व देशासाठी केलेला त्याग कायम स्मरणात राहील.

# मानव कल्याणासाठी जैवतंत्रज्ञानातील नवीनतेवर आंतरराष्ट्रीय परिषद

## सीकेटी महाविद्यालयात दोन दिवस आयोजन

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

चांगू काना ठाकूर आर्टस् कॉमर्स अँड सायन्स (स्वायत्त) महाविद्यालयात राष्ट्रीय उच्चतर शिक्षा अभियाना अंतर्गत आणि अंतर्गत गुणवत्ता हमी कक्षाच्या समन्वयाने जैवतंत्रज्ञान विभागाच्या वतीने मानव कल्याणासाठी जैवतंत्रज्ञानातील नवनवीनता या शीर्षकावर दोन दिवसीय आंतरराष्ट्रीय परिषदेचे २२ आणि २३ फेब्रुवारी २०२४ रोजी आयोजन करण्यात आले होते.




या परिषदेसाठी प्रमुख पाहुणे म्हणून अॅ. मी. टी. युनिव्हर्सिटी, मुंबई येथील रिसर्च डीन डॉ. सुप्रसन्ना पेन्ना, नॅशनल सेंटर फॉर सेल सायन्सेस पुणेच्या शास्त्रज्ञ-जी, डॉ. शर्मिला बापट, भाभा अणुसंशोधन केंद्र मुंबई, येथील माजी शास्त्रज्ञ, पद्मश्री डॉ. शरद पी. काळे आणि सायन्सेस आणि आय.टी.च्या माजी डीन व बायोटेक्नॉलॉजी विभागाच्या (MPU, भोपाल) प्रा. डॉ. सुगंधा सिंग उपस्थित होत्या तसेच (Universit degli Studi dell'Aquila) इटली येथील डॉ. मारिका पेलेग्रीनी आणि रेजेनेरॉन फार्मास्युटिकल्स, Inc., Tarrytown, New York, USA च्या वरिष्ठ संचालिका डॉ. प्राची शर्मा यांनी दूरस्थ पद्धतीने या परिषदेमध्ये सहभाग घेतला.

या परिषदेच्या सुरवातीला प्राचार्य प्रो. डॉ. एस. के. पाटील यांनी महाविद्यालयाच्या कीर्तीची मागोवा घेऊन परिषदेचे महत्व विषद केले. या परिषदेची प्रस्तावना परिषदेच्या समन्वयिका व जैवतंत्रज्ञान विभागाच्या विभाग प्रमुख डॉ. सीमा कोकितकर व प्रमुख पाहुण्यांची ओळख डॉ. शर्मिला घंगाले यांनी केली.

या परिषदेस विविध विद्यापीठे, संस्था, महाविद्यालये आणि उद्योगांमधील १३४ हून अधिक संशोधक उपस्थित होते. या परिषदेचे उद्दिष्ट आरोग्य, पर्यावरण आणि समाजातील जागतिक आव्हानांना तोंड देण्यासाठी जैवतंत्रज्ञानाच्या सामर्थ्याचा उपयोग आणि नाविन्यपूर्ण कल्पनांना चालना देणे, अर्थपूर्ण संबंध निर्माण करणे आणि जैवतंत्रज्ञानाच्या क्षेत्रातील प्रगतीचा मार्ग मोकळा करणे असे होते. परिषदेच्या पहिल्या दिवशी डॉ. सुप्रसन्ना यांनी उपस्थितांना बायोटेक्नॉलॉजीमधील नवीन संधी आणि नवकल्पनांचे ज्ञान दिले आणि ज्यामुळे अन्न सुरक्षा मिळते अशा संशोधनावर लक्ष केंद्रित करायला सांगितले. तसेच डॉ. शर्मिला बापट यांनी ओवेरीअन कर्करोगावरचे संशोधन आणि नवीन तंत्रज्ञान या विषयाचे महत्त्व पटवून दिले. डॉ. मारिका पेलिग्रिनी, यांनी शाश्वत शेती आणि वनस्पतींच्या वाढीसाठी लागणारे सूक्ष्मजीव तंत्र या विषयावर मार्गदर्शन केले.

दुसऱ्या दिवशी पद्मश्री डॉ. शरद पी. काळे यांनी कचरा व्यवस्थापनासाठी व्यावहारिक कौशल्ये आत्मसात करून पर्यावरणीय शाश्वततेचे प्रबोधन केले. डॉ. प्राची शर्मा यांनी औषध सुरक्षा आणि औषधांचे महत्त्व या विषयावर मार्गदर्शन केले. शेवटच्या सत्रात डॉ. सुगंधा सिंग यांनी जैवतंत्रज्ञानाचे विविध पैलू आणि मानव कल्याणातील त्याचे महत्त्व सांगून समारोप केला. परिषदेसाठी प्राचार्य प्रो. डॉ.एस.के. पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली परिषदेच्या समन्वयिका व जैवतंत्रज्ञान विभागाच्या विभाग प्रमुख डॉ. सीमा कोकितकर, प्रा. सुशीलकुमार घाडगे, प्रा. लतिका चव्हाण, डॉ. शर्मिला घंगाले, प्रा. रुपाली नानेकर प्रा. माधुरी वैशंपायन, प्रा. भावना सूर्यवंशी, डॉ. अनुप्रिता वाठारकर, प्रा. लमा सिरकोट यांनी विशेष परिश्रम घेतले.

यशस्वी आयोजनाबद्दल संस्थेचे चेअरमन लोकनेते रामशेठ ठाकूर, अध्यक्ष अरुणशेठ भगत, व्हाईस चेअरमन वाय. टी. देशमुख, आमदार प्रशांत ठाकूर आणि सचिव डॉ. एस. टी. गडदे यांनी कौतुक केले.

### संवादात्मक सत्रांमध्ये मौखिक आणि पोस्टर सादरीकरण

संवादात्मक सत्रांमध्ये संशोधकांनी २४ मौखिक सादरीकरणे आणि १९ पोस्टर सादरीकरणे प्रदर्शित केली. यामधील विजेत्यांना पारितोषिकांचे वितरण रामशेठ ठाकूर महाविद्यालय, खारघरचे प्राचार्य डॉ. रूपेंद्र गायकवाड यांनी केले. परिषदेचे सूत्रसंचालन आणि परिषदेचे अहवाल वाचन डॉ. शर्मिला घंगाले आणि आभार प्रदर्शन डॉ. सीमा कोकितकर यांनी केले.

## दागिन्यांची चोरी

**पनवेल : वार्ताहर**

ब्युटी पार्लर चालवणाऱ्या महिलेच्या घरामध्ये ग्राहक म्हणून गेलेल्या महिलेने या घरातून तब्बल ११ लाख १५ हजार रुपये किमतीचे दागिने चोरले. या चोरट्या महिलेला खांदेश्वर पोलिसांनी ताब्यात घेतले आहे. सिमरन कौर असे या महिलेचे नाव असून खांदेश्वर पोलिसांनी तिच्याकडून चोरून नेलेले सर्व दागिने हस्तगत केले आहेत.

विपुला भालेकर (वय २५) ही पनवेलमधील वाजे, चेरवली येथे कुटुंबासह राहते. येथेच तिचा ब्युटी पार्लरचा व्यवसाय आहे. सिमरन कौर ही ब्युटी पार्लरची सर्व्हिस घेण्यासाठी आसुडगाव येथे गेली होती. तिने एसीमध्ये सर्व्हिस देण्यास सांगितल्याने विपुलाने तिला पहिल्या मजल्यावरील बेडरूममध्ये नेले. ब्युटीशियनचे काम झाल्यानंतर सिमरनने शरीर चिकट झाल्याचे सांगून मला अंग पुसून कपडे बदलायचे असल्याचे सांगत विपुला हिला थोड्या वेळासाठी बेडरूममधून बाहेर जाण्यास सांगितले. त्यानंतर कपाटात असलेले सर्व दागिने तिने चोरले. यादरम्यान विपुलाचा भाऊ विदेश घरी आल्याने त्याने आपल्या हातातील सोन्याचे कडे कपाटात ठेवण्यास पत्नीकडे दिले. ते घेऊन विदेशची पत्नी गेली असता कपाटात इतर दागिने नसल्याचे तिच्या लक्षात आले. त्यावर विपुलाने सिमरनला घरी बोलावून घेतले व दागिन्यांबाबत चौकशी करून ते परत देण्यास सांगितले, मात्र तिने उडवाउडवीची उत्तरे दिली. त्यानंतर विपुलाने खांदेश्वर पोलीस ठाण्यात तक्रार दिल्यावर पोलिसांनी सिमरन कौर हिला ताब्यात घेतले असता तिने चोरी केल्याचे कबुल केले.

## संपादकीय

# बडबडीचे दुष्परिणाम

जरांगे यांचा तोल अधूनमधून जात होताच, परंतु दरवेळी शिंदे, फडणवीस यांनी संयम पाळला. आंदोलनाच्या भरात कधी कधी भाषा घसरते. काही वेळा ते समजूनही घेता येते. परंतु जेव्हा अशा आक्रमकतेला कृतघ्नपणाचा आणि जातियवादाचा दर्प येऊ लागतो तेव्हा तिचा धिक्कार व्हायलाच हवा.

**मराठा समाजाला दहा टक्के आरक्षण देण्याचा निर्णय घेऊन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी आपला शब्द पाळला तरी मराठा आंदोलन अद्याप चालूच आहे. किंबहुना, त्यानंतर ते भरकटत चालले आहे असे म्हणावे लागते. मुख्यमंत्री शिंदे आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी जिवाचे रान करून अत्यंत प्रामाणिक भावनेने मराठ्यांना दहा टक्के आरक्षण देण्याचा प्रस्ताव विधिमंडळात मंजूर करून घेतला. विरोधी पक्षांनीदेखील त्यांना एकमताने साथ दिली आणि गेली अनेक वर्षे चिघळलेला मराठा आरक्षणाचा प्रश्न अंतिम टप्प्यात आल्याची सुखद भावना निर्माण झाली. विशेष म्हणजे इम्पिरिकल डेटा यावेळी सर्वोच्च न्यायालयासमोर सादर करता यावा यासाठी राज्य सरकारने अथक प्रयत्न केले आहेत. यावेळचे मराठा आरक्षण सर्वोच्च न्यायालयात टिकेल अशी खात्री त्यामुळेच वाटते. ठाकरे गटाचे प्रमुख उद्धव ठाकरे यांनी देखील प्रस्ताव मंजूर झाल्यानंतर त्याचे स्वागत केले. तशीच भावना साऱ्यांची होती. तथापि, मराठा आंदोलनाचे नेते मनोज जरांगे यांनी मात्र मराठ्यांना आरक्षण ओबीसींमधूनच हवे हा हेका सोडला नाही. स्वतंत्र आरक्षण मिळत असताना ओबीसी आरक्षणाचा हट्ट ते कशासाठी धरत आहेत हे अजूनही अनाकलनीय कोडे आहे. त्यामुळेच त्यांचा बोलविता धनी वेगळाच असावा असा संशय व्यक्त केला जाऊ लागला आहे. जरांगे यांच्या हटवादी भूमिकेमुळे त्यांचे आंदोलनातील साथीदार सोडून जाऊ लागले आहेत हे दृश्य मराठा समाजातील त्यांच्याच समर्थकांकरिता वेदनादायी असावे. तरीही रविवारी जरांगे यांनी साऱ्याच हद्दी ओलांडल्या. आजवर त्यांचे प्रामाणिक आणि आक्रमक नेतृत्व मराठेतर समाजाला देखील भावले होते. परंतु त्या आक्रमकतेने रविवारी अतिशय खालची पातळी गाठली. ज्या देवेंद्र फडणवीस यांनी आरक्षण मराठा समाजाच्या हातांपर्यंत आणून दिले, त्यांना जातिवाचक शिव्यांची लाखोली वाहात जरांगे यांनी एकेरीची भाषा वापरली. याला नेतृत्व म्हणत नाहीत. फडणवीस यांनी मराठा समाजाला चिरडायचे ठरवले आहे, इतकेच नव्हे तर सलाइनद्वारे विष देऊन माझा बळी घेण्याचा प्रयत्न सुरू ठेवला आहे असे बेफाम आरोप जरांगे यांनी केले. वारेमाप शिवराळ टीका करताना त्यांचे भान पुरते सुटले होते हे कोणीही सांगेल. कारण हा सारा तमाशा वृत्तवाहिन्यांवर थेट प्रक्षेपणाद्वारे सर्वांनीच पाहिला. फडणवीस यांना माझा बळी घ्यायचा असल्याने मी आताच सागर बंगल्यावर जात आहे अशी बडबड करून जरांगे यांनी तिरमिरीमध्ये अंतरवाली सराटी येथील आंदोलन स्थळ सोडले आणि मुंबईकडे निघाल्याचा शो केला. अर्थात मुंबईपर्यंत ते आले नाहीत. जेमतेम दीड किलोमीटर अंतर कापल्यावर ते परत फिरले. जरांगे यांच्या या दुर्दैवी बडबडीमुळे आणि विनाकारण घातलेल्या थैमानामुळे मराठा आंदोलनाचेच अंतिमत: नुकसान होते आहे, हे त्यांना कोण सांगणार? सकल मराठा समाजातर्फे आपल्या मागण्यांसाठी आजवर ५८ विशाल मोर्चे शांततेत निघाले होते. या चळवळीने कायम आपली सभ्य व सुसंस्कृत प्रतिमा जपली. जरांगे यांच्या हातात आंदोलन गेल्यानंतर या चळवळीला गालबोट लागत आहे.**

# मराठी भाषेचे संवर्धन करणे गरजेचे...

आपल्या मराठी भाषेला, प्राचीन काळापासून साधूसंत व साहित्यिकांनी उत्क्रांतीसाठी साहाय्य केले आहे. प्रत्येक व्यक्तीचे जसे एक घराणे असते, तसेच भाषेचेही आहे. जगभरात आजमितीस तीन हजारपर्यंत भाषा आहेत. त्याची अकरा कुळात विभागणी केलेली आहेद्र असे भाषा अभ्यासिकांचे मत आहे. त्यातील आर्यभारती कुळात असणाऱ्या भाषांमध्ये मान्यताप्राप्त अशा विकसित झालेल्या मराठी भाषेचे विशेष स्थान आहे. अशा या मराठी भाषेची उत्पत्ती वा इतिहासाचा मागोवा घेणे क्रमप्राप्त आहे. दोन व्यक्तींमध्ये संवाद साधण्याचे साधन म्हणजे भाषा. ही भाषेची व्याख्या समजतात. भारतात स्थूल मानाने मराठीसह अडतीस भाषा बोलल्या जातात. एका संशोधनाद्वारे उपलब्ध झालेल्या माहितीनुसार महाराष्ट्रात बोलली जाणारी मराठी भाषा अन्य प्रांतातच नव्हे तर सातासमुद्रापार (परदेशात) असलेल्या देशातही पोहोंचली आहे. १९५१चा खानेसुमारी आढावा घेता, मराठी भाषिकांची संख्या साठ कटी असावी असे समजतात.

मराठी भाषा ही ईश्वरनिर्मित आहे, पण महाराष्ट्री आणि अपभ्रंश यांच्या संयोगातून मराठी भाषा निर्माण झाली आहे. इ. स. ५०० पासून तिच्यात उत्क्रांती होऊन इ. स. ७००पर्यंत ती बोलीभाषा म्हणून पूर्णत्वास आली. महाराष्ट्र हे नाव फारसे जुने नाही. इ. स. ५०५मध्ये वराहमिहीर व इ. स. ६११मध्ये पुलकेशी यांनी उभारलेल्या शिलालेखात महाराष्ट्राचा प्रथम उल्लेख सापडतो.

काहींच्या मते मराठी भाषेचा उगम आर्य भाषेपासून झाला असेही समजतात. इसवी सनापूर्वी महाराष्ट्री ही प्राकृत भाषा हती. संपूर्ण भारतात असलेल्या प्राकृत



भाषेमध्ये मराठी ही मुख्य आणि मन्यताप्राप्त ग्रंथभाषा होती. इथे आलेल्या रट्ट किंवा रट्टिक वंशाच्या लोकांनी ठिकठिकाणी वसाहती केल्या. त्या वसाहतींचे झालेले एकत्रीकरण म्हणजे महाराष्ट्र. कालांतराने या महाराष्ट्राची बोलीभाषा मराठी झाली.

महाराष्ट्रात प्रथम मौर्य घराण्याची सत्ता हती हे सिद्ध आहे. मौर्यानंतर शातवाहन हे सनातनी हिंदू हते. पुढे त्रैकूटक वरवाटकानंतर समुद्र गुप्ताने दक्षिणेत स्वारी केली. त्यांनी एरंडपल्ली व देवराष्ट्राचा कुबेर याचा पराभव केला. वरवाटकानंतर कलचरी घराण्याचा महाराष्ट्राशी संबंध आला. कलचुरींचा मंगलिश नावाच्या चालुक्याने पराभव केला. चालुक्य घराण्याच्या अंमल इ. स. ११८९पर्यंत सुरू होता. त्यांच्यानंतर यादवांची सत्ता, भिल्लम नावाच्या राजाने सुरू केली. या घराण्याच्या दोन शाखा हत्या. त्यांच्यात आपसात भांडणे होत होती. देवगिरीच्या सिंध राजाने बाजी मारून सन ११८९पासून इ. स. १३९२पर्यंत यादवांच्या सात राजांनी राज्य केले. त्यांच्या राज्यात मराठा धर्म (कार्य) मराठी भाषा व मराठी वाङमयाच्या दृष्टीने हि राजवट उल्लेखनीय होती. संत संन्याशी, कवी याना स्वस्थता लाभून उत्तम दर्जाचे साहित्य, काव्य निर्माण होऊ लागले.

याच राजवटीत मुकुंदराज, महानुभावी साधू, ज्ञानेश्वर महाराज उदयास आले. ज्ञानेश्वरीसारखे अमोल ग्रंथ मराठी भाषेत झाला. पुढे बहामनी राज्य सुरू झाले. या काळात संत एकनाथ, दासोपंत, कवी मुक्तेश्वर, संत तुकाराम, संत रामदास यांच्या मराठी भाषेतील साहित्याची व ग्रंथाची निर्मिती झाली व मराठी भाषेला साज चढविला गेला. मराठी भाषा संपन्न झाली.

पुढे पेशवाईत, श्रीधर, मोरोपंत, मध्वमुनी व महर्षी कवींनी काव्ये केली. इंग्रजी अंमलात अन्य साहित्य निर्माण झाले नसले तरी, लो. बाळ गंगाधर टिळक, आगरकर, चिपळूणकरांनी आपल्या सिद्धहस्त लेखणीने उत्तम साहित्य निर्माण करून मराठी भाषेचे भविष्य उज्वल कोले. तत्कालीन समाजात लेखाद्वारे स्फुलिंग पेटविले हा इतिहास आपणास माहित आहे. या लेखातील आशय हा मराठी भाषेचा एक पैलू समजावयास हरकत नाही.

मराठी भाषा विकासाचे किंवा विस्ताराचे असे पाच कालखंड मानले जातात. १) यादवकालीन (२) बहामनी कालीन, (३) शिवकालीन, (४) पेशवेकालीन, (५) आंग्लकालीन या सर्व कालखंडात मराठी बोली भाषेत कालिक व व्याकरणदृष्ट्या भेद दिसून आले असले तरी ती स्थानिक माय मराठी भाषा आहे. काहींच्या मते मराठी भाषा. प्रथम मोडी लिपीमध्ये लिहिली जात असे. देवनागरी लिपी ही संस्कृत भाषेच्या जवळची आहे. किंबहुना संस्कृत भाषेपासून निर्माण झाली असे समजतात. शिवाय मोडी भाषेपेक्षा देवनागरी लिपीमध्ये लिहिणे सोपे जात असल्याने देवनागरी लिपी सर्वमान्य व प्रचलित झाली. विठ्ठलाचे भक्त व वारकरी मंडळी ज्या ग्रंथाला माऊली म्हणून संबोधतात, त्या संत ज्ञानेश्वर महाराज लिखित, मराठी भाषेतील आद्यग्रंथ श्रीमद ज्ञानेश्वरी ग्रंथ यादवांच्या काळात लिहिला गेला, तसेच संत ज्ञानेश्वर, सोपानदेव, निवृत्तीनाथ, मुक्ताबाई, त्याचप्रमाणे संत नामदेव, गोरा कुंभार, एकनाथ महाराज, सावतामाळी, विसोबा खेचर, नरहरी सोनार, चोखामेळा, परसा भागवत राका कुंभार, सेना न्हावी व कान्होपात्रा यांनी आपल्या श्लोक व अभंगांनी मराठी भाषेला उत्तम साज चढवून सर्वश्रुत केली. ती यादव कुळात अगदी अलिकडे मराठी विश्वकोश निर्माते लक्ष्मणशास्त्री जोशी यांनी अत्यंत मेहनतीने व संशोधन करून मराठी भाषेला उज्वल भवितव्य मराठी विश्वकोशाच्या माध्यमातून दिले आहे. त्याची ही सेवा मराठीचे वाचक, लेखक कधी विसरणार नाहीत. यासंदर्भात सांगावेसे वाटते की, इंग्रजी भाषा संवर्धकांनी हिंदी मराठीतून अनेक शब्द घेऊन भाषा समृद्ध केली. त्याप्रमाणे मराठी भाषा संशोधकांनी मराठी भाषेच्या उत्क्रांती व समृद्धीसाठी अन्य भाषांतून चपखल बसणारे शब्द मराठीत आणून ते प्रचलित करावेत. ज्या योगे मराठी भाषा समृद्ध होईल.

महाराष्ट्रात मराठी भाषेच्या उत्क्रांतीनंतर विभाग विभागातून अनेक उपभाषा बोलल्या जात होत्या. त्यांची थोडक्यात माहिती घेणे अप्रस्तुत होणार नाही. बाणकोटी भाषा मुरूड, जंजिरा भागात बोलली जाते. मावळी ही भाषा मावळ प्रांतात प्रचलित आहे. धारी भाषा कोकणालगतच्या रायगड आणि भोर संस्थानांत बोलतात. संगमेश्वरी ही भाषा रत्नागिरी जिल्ह्यात बोलली जाते. कोळी भाषा समुद्राच्या किनाऱ्याजवळील प्रदेशात मासेमारी करणाऱ्या कोळी समाजात बोलली जाते. भाषेचा विशिष्ट उच्चार व हेल काढून बोलण्याच्या पद्धतीमुळे लक्षात राहते. किरिस्तांव ही पण एक कोळी भाषा असून भाषेवर पोर्तुगीज भाषेचा पगडा दिसून येत, तसेच वाडवळ ही भाषा कोकणाशी मिळतीजुळती असल्याचे मानतात. ही भाषा चौकळशी, पाचकळशी समाजात बोलतात. याशिवाय रायगड व ठाणे जिल्ह्यात आगरी कातकरी भाषा तसेच ठाकूर जमातीची ठाकरी भाषा, भिल्ल समाजाची भिल्ली भाषा. याशिवाय रायपूर, नागपुरी, राजापुरी, कुडाळी, अहिराणी, खान्देशी, वऱ्हाड प्रांतातील वऱ्हाडी, कोल्हापुरी, पुणेरी, सोलापुरी, या भाषा मराठी भाषेतील बोलीभाषा आहेत.

मराठी भाषा महाराष्ट्र व गोवा राज्याची अधिकृत राजभाषा मानतात. विपुल साहित्य संपदा असलेल्या मराठी भाषेला थोर परंपरा लाभलेली आहे. स्वातंत्र्य प्राप्तीनंतरही मराठी भाषिक नेत्यांनी मराठी भाषेसाठी प्रयत्न करणे गरजेचे होते. साहित्यिकांनी जे काही प्रयत्न केले ते अपुरे पडले. नव्या शैक्षणिक धोरणानुसार महाराष्ट्रात इयत्ता पहिलीपासून उच्च शिक्षणापर्यंत मराठीचा अभ्यास सुरू करणे गरजेचे आहे. समस्त मराठी जनानी आपल्या भाषेबद्दल अभिमान बाळगावा. समृद्ध करण्यासाठी प्रयत्न करावेत.

**-अनंत कानू सिंगासने,**
(पनवेल)



## बदलते तंत्रज्ञान

## जीमेलच्या सेवेबाबत गुगलकडून स्पष्टीकरण

गुगल नेहमी नवनवीन बदल करत असते. काही दिवसांपूर्वी गुगलने अमेरिकेत आपली जिपे सेवा बंद करणार असल्याची माहिती समोर आली होती. दरम्यान, जीमेलबाबतही मोठी माहिती समोर आली आहे. या अहवालात दावा करण्यात आला




आहे की, गुगल आर्थिक तोट्यामुळे अनेक मोठी पावले उचलत आहे. या पार्श्वभूमीवर जीमेल सेवा बंद करणार असल्याची माहिती समोर आली होती.

डिजिटल पेमेंट ॲप आता जगभरात लोकप्रिय झालेले आहेत. रोख रक्कम नसणे, सुट्ट्याची कटकट यामुळे ॲपद्वारे खरेदी-विक्री करण्याच्या व्यवहारात वाढ झाली आहे. नुकतेच भारतात पेटीएम कंपनीचा गैरव्यवहार समोर आल्यानंतर अनेक पेटीएम वापरकर्त्यांचे पैसे वॉलेटमध्ये अडकले आहेत. त्यानंतर आता गुगल पेबाबत एक मोठी बातमी समोर आली आहे. ४ जून २०२४ रोजी अमेरिकेत गुगल पे ॲप बंद करण्याचा निर्णय गुगलने घेतला आहे. याबदल्यात वापरकर्त्यांना गुगल वॉलेटचा पर्याय गुगलकडून देण्यात आला आहे.

गुगलने प्रसिद्ध केलेल्या एका ब्लॉग पोस्टमध्ये म्हटले की, अमेरिकेत यापुढे गुगल पेऐवजी गुगल वॉलेट ॲप वापरण्यात यावे. गुगल पेमधील बॅलन्स इतर ठिकाणी वळविण्यात यावा. अमेरिकेत जरी गुगल पे बंद होणार असले तरी भारत आणि सिंगापूरमध्ये ॲप सुरुच राहणार आहे. भारत आणि सिंगापूरमधील आमच्या कोट्यवधी ग्राहकांना या नव्या बदलांचा कोणताही फरक पडणार नाही. भारतातील ग्राहक गुगल पेच्या मदतीने पैसे स्वीकारू शकतात आणि पाठवू शकतात.

याबाबत बातम्या मोठ्या प्रमाणात व्हायरल झाल्या होत्या. दरम्यान, आता यावर गुगलने स्पष्टीकरण दिले आहे. गुगलने एका निवेदनात सांगितले की, जीमेल सेवा बंद होणार नाही, त्याची सेवा सुरूच राहणार आहे. वापरकर्त्यांना अजिबात काळजी करण्याची गरज नाही, असे यात म्हटले आहे.

जगभरात १८० कोटींहून अधिकजण जीमेल वापरतात. याशिवाय ही सर्वांत लोकप्रिय ई-मेल प्रणालीदेखील आहे. जीमेल सेवा बंद झाल्याची बातमी व्हायरल होताच सोशल मीडियावर चर्चा सुरू झाली. जीमेल सेवा बंद होणार असल्याची बातमी पूर्णपणे खोटी असल्याचे गुगलने सांगितले आहे.

# अग्रगण्य कवी, लेखक, नाटककार कुसुमाग्रज

विष्णू वामन शिरवाडकर तथा तात्यासाहेब शिरवाडकर हे मराठी भाषेतील अग्रगण्य कवी, लेखक, नाटककार, कथाकार व समीक्षक होते. त्यांनी 'कुसुमाग्रज' या टोपण नावाने कवितालेखन केले. ते आत्मनिष्ठ व समाजनिष्ठ जाणीव असणारे मराठीतील महत्त्वाचे लेखक मानले जातात.

शिरवाडकरांचे वर्णन सरस्वतीच्या मंदिरातील देदीप्यमान रत्न असे करतात. वि.स. खांडेकर यांच्यानंतर मराठी साहित्यात ज्ञानपीठ पुरस्कार मिळवणारे ते दुसरे साहित्यिक होते. त्यांचा जन्म दिवस (२७ फेब्रुवारी) हा मराठी भाषा गौरव दिन अथवा मराठी राजभाषा दिवस म्हणून साजरा केला जातो. मराठी अभिरुचीवर चार दशकांपेक्षा अधिक काळ प्रभाव गाजविणारे श्रेष्ठ प्रतिभावंत कवी, नाटककार, कथाकार, कादंबरीकार, लघुनिबंधकार व आस्वादक समीक्षक. प्रामाणिक सामाजिक आस्था, क्रांतिकारक वृत्ती आणि शब्दकलेवरचे प्रभुत्व ही त्यांच्या काव्याची वैशिष्ट्य आहेत. त्यांच्यातल्या सखोल सहानुभूतीने त्यांना समाजाच्या सर्व थरांतील वास्तवाला भिडण्यासाठी आणि पौराणिक आणि ऐतिहासिक व्यक्तिमत्त्वांमधील मानवी वृत्तीचा शोध घेण्यासाठी प्रवृत्त केले. त्यांच्यातल्या शोधक आणि चिकित्सक स्वभावाने त्यांना प्रत्यक्ष प्रश्न उपस्थित करायला आणि



### निमित्त

माणसाच्या समग्रतेचे आकलन करायला प्रवृत्त केले. त्यांचे समृद्ध आणि प्रगल्भ व्यक्तिमत्त्व त्यांच्या साहित्यात प्रतिबिंबित झाले आहे. मराठी कुसुमाग्रजांच्या कविता तरुणांना प्रेरणा देणाऱ्या आहेत.

कुसुमाग्रजांचा जन्म पुणे येथे झाला. त्यांचे मूळ नाव गजानन रंगनाथ शिरवाडकर असे होते. त्यांचे काका वामन शिरवाडकर यांनी त्यांना दत्तक घेतल्याने त्यांचे नाव विष्णू वामन शिरवाडकर असे बदलले गेले. कुसुमाग्रजांना सहा भाऊ आणि कुसुम नावाची एक लहान बहीण होती, एकुलती एक बहीण सर्वांची लाडकी म्हणून कुसुमचे अग्रज म्हणून 'कुसुमाग्रज' असे नाव त्यांनी धारण केले. तेव्हापासून शिरवाडकर कवी कुसुमाग्रज या टोपण नावाने ओळखले जाऊ लागले. नाशिक येथील हं. प्रा. ठा. कला महाविद्यालयातून त्यांनी आपले बी.ए. पर्यंतचे शिक्षण पूर्ण केले. बी.ए.ची पदवी मिळाल्यानंतर काही काळ त्यांनी चित्रपट व्यवसायात पटकथा लिहिणे, चित्रपटात छोट्या भूमिका करणे अशी कामे केली. यानंतर सोबत, स्वराज्य, प्रभात, नवयुग, धनुर्धारी, अशा विविध नियतकालिकांचे, वृत्तपत्रांचे संपादक म्हणून त्यांनी काम केले. १९३०मध्ये झालेल्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या काळाराम मंदिराच्या सत्याग्रहात कुसुमाग्रज यांचाही सहभाग होता. त्यांच्या क्रांतिकारी कवितांची सुरुवात याच लढ्यापासून झाली आहे. १९३३ साली त्यांनी मध्रुव मंडळाफ्ची स्थापना केली. अनेक सामाजिक चळवळीत, सत्याग्रहांमधे सहभाग घेतला.

पुढील काळातही त्यांनी नाशिक जिल्ह्यातील आदिवासी विद्यार्थ्यांना शिक्षणासाठी मदत केली. पत्रकारितेच्या निमित्ताने मुंबईत आल्यावर शिरवाडकरांना मुंबई मराठी साहित्य संघाचे डॉ. अ. ना. भालेराव भेटले. मराठी रंगभूमीचा सुवर्णकाळ संपून ती मृतप्राय होऊ नये म्हणून झटणारे भालेराव यांनी कवी शिरवाडकरांना नाटके लिहिण्यास प्रवृत्त केले, केवळ कवी असलेले वि.वा. शिरवाडकर बघता बघता एक यशस्वी नाटककार झाले. **(साभार इंटरनेट)**

### क्लिक...क्लिक...!



**खोपोली : शहरातील जनता विद्यालयाच्या प्रवेशद्वारावरच मोठ्या प्रमाणात कचरा टाकण्यात येत असून, विद्यार्थ्यांच्या आरोग्याशी खेळ सुरू आहे. खोपोली नगर परिषदेची घंटागाडी संपूर्ण शहरात फिरत असताना अशाप्रकारे उघड्यावर कचरा टाकणाऱ्यांवर दंडात्मक कारवाईची मागणी होत आहे. (छाया : जयवंत माडपे)**

## आरोग्य प्रहर

## सर्दी-पडशावर घरगुती आहारशास्त्रीय उपचार

सध्या वातावरणातील बदलांमुळे सर्वत्र सर्दी, पडसे आणि ताप यासारखे आजार सुरू आहेत. यासाठी विविध विषाणू कारणीभूत ठरतात. त्यामुळे वेळेत डॉक्टरांकडे तर जावेच. सोबत काही घरगुती उपायदेखील करावेत...



आहारात ताजे घरगुती पदार्थ नसणे हेदेखील आजारपणाचे एक महत्त्वाचे कारण आहे. आपण घरगुती पदार्थ खातो त्यावेळेस आजारी पडण्याचे प्रमाण कमी असते. मुळात घरगुती अन्न बहुतांश वेळेस ताजेच असते, मात्र तुम्ही बाहेरचे अन्न वारंवार खात राहता त्या वेळी त्यासाठी वापरलं गेलेले तेल, पदार्थ हेदेखील चांगलेच वापरलेले असतात किंवा ताजे असतात याची कोणतीही खात्री नसते.

आहाराचे मूळ तत्व हे माफक प्रमाणात आहार हेच आहे तसेच पाककलेचे तत्त्वदेखील माफक प्रमाणाचेच आहे. अन्न तयार करण्याचेदेखील मूलतत्व हे माफक प्रमाणात अन्नघटक वापरण्याचेच आहे. त्यामुळे जेवण करताना हा नियम लक्षात ठेवणे अतिशय आवश्यक आहे. जेवणामध्ये मीठ जास्त टाकले की, त्यातील आवश्यक जीवनसत्वांवर त्याचा वाईट परिणाम होतो जेवणामध्ये साखर जास्त प्रमाणात असेल, तर शरीरात आवश्यक असणाऱ्या सूक्ष्माणूंचे (गट मायक्रोब) प्रमाण कमी होऊन जातं त्यामुळे उत्तम आहारासाठी अन्नघटकांचे योग्य प्रमाण आवश्यक असते.

संसर्गजन्य सर्दी पडसे होताना सुरुवातीला घसा दुखणे, डोकेदुखी, अस्वस्थ वाटणे आणि हळूहळू नाक चोंदणे असे प्रकार होत सर्दी पडसे बळावू शकते. ताप येऊ लागतो आणि अतिशय थकवा येतो. दोन-तीन दिवस साधारण संसर्ग वाटणाऱ्या सर्दी खोकल्याचा जोर उतरू शकतो. वेळेत योग्य उपचार न केल्यास मात्र ज्यांची रोगप्रतिकारकशक्ती कमी आहे त्यांच्यामध्ये याचे प्रमाण पाच ते सात दिवस इतपत टिकून राहते.

अनेकदा सर्दी खोकल्यावर उपचार करताना आवश्यक पदार्थांचा अर्क पाण्यात एकत्र करून चहाच्या किंवा काढ्याच्या स्वरूपात प्यायला जाऊ शकतो. आहारशास्त्रानुसार उपचारांचा तक्ता खालीलप्रमाणे...

सर्दी बळावण्यापूर्वी व नंतरही हे घरगुती उपचार केले जाऊ शकतात, पण सुरुवातीच्या दिवसांमध्ये सर्दी रोखण्यास त्यामुळे मदत होईल, कारण या उपचारांमध्ये रोगप्रतिकारकशक्ती वाढविण्याची क्षमता अधिक आहे. वेळीच उपचार केलेत तर विकार बळावणार नाहीत.

# महाडमध्ये दुचाकी चोरणारी टोळी गजाआड



**महाड : प्रतिनिधी**

महाडमधून मोटरसायकल चोरून पळून जाण्याच्या प्रयत्नात असलेल्या एका चोराला महाड औद्योगिक पोलिसांनी फिल्मी स्टाईलने पकडले. त्यानंतर अन्य जणांनादेखील अटक करण्यात आली आहे. त्याचप्रमाणे विविध ठिकाणावरून चोरलेल्या बाईक ताब्यात घेतल्या आहेत. महाड एमआयडीसी पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक मारुती आंधळे यांनी दाखवलेल्या सतर्कपणामुळे या टोळीच्या मुसक्या आवळण्यात यश आले आहे. मारुती आंधळे आणि त्यांच्या पथकाचे सर्वत्र कौतुक केले जात आहे.

याबाबत पोलीस उपविभागीय अधिकारी शंकर काळे यांनी दिलेल्या माहितीनुसार महाड मधून मोटरसायकल चोरून पळून जाण्याच्या प्रयत्नात असलेल्या एका चोराला फिल्मी स्टाईलने केल्यानंतर त्याच्याकडून मिळालेल्या माहितीनुसार अन्य दोघांना विविध ठिकाणाहून ताब्यात घेत त्यांच्या मुसक्या आवळल्या आहेत. या तिघांकडून विविध ठिकाणी चोरलेल्या आणि विविध ठिकाणी विक्री झालेल्या मोटारसायकलदेखील महाड औद्योगिक पोलिसांनी हस्तगत केल्या आहेत. या धडक कारवाईचे महाड परिसरामध्ये कौतुक केले जात आहे. दिनांक २२ फेब्रुवारी रोजी सकाळी अकरा वाजताच्या सुमारास रूपेश शंकर पवार राहणार टेमघर यांनी त्यांच्या मालकीची होंडा युनिकॉर्न मोटरसायकल घराच्या अंगणात पार्किंग केली असता चोरी झाल्याचे निदर्शनास आले. त्यानंतर त्यांनी २३ फेब्रुवारी रोजी महाड औद्योगिक पोलीस ठाण्यात तक्रार दिल्यानंतर आजूबाजूच्या सीसीटीव्ही फुटेज नुसार तपास केला असता आरोपींचा माग काढण्यात माग काढण्यात पोलिसांना यश आले, त्यानुसार सागर विरेंद्र सिंग सोळंकी रा. आदर्श नगर, बिरवाडी याला शिताफीने पकडण्यात आले. त्यानंतर त्याने युवराज विठोबा जगताप २७ राहणार साखळी सुहास रमेश नाईलकर रुपवली यांची नावे सांगितल्यानंतर त्यांना देखील ताब्यात घेण्यात आले. त्यांच्याकडून विविध ठिकाणी विक्री झालेल्या मोटार सायकल जप्त केल्या आहेत.

या सर्व मोटरसायकल भिवंडी, प्रतापगड, मंडणगड, रुपवली, महाड साकडी, कुसगाव, चिंबावे, येथून ताब्यात घेतल्या आहेत. आरोपींना अटक करण्यात आले असून त्यांच्यावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

## गोव्याचे मुख्यमंत्री आज कर्जतला; भाजप पदाधिकाऱ्यांची बैठक

**कर्जत :** कर्जतमध्ये मंगळवारी (दि. २७) गोव्याचे मुख्यमंत्री प्रमोद सावंत येणार आहेत. त्या समारंभाच्या नियोजनासाठी भाजप कर्जतच्या वतीने नियोजन बैठकीचे आयोजन केले होते.

या समारंभाच्या नियोजनासाठी आमदार प्रशांत ठाकूर व जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी यांनी बैठक घेतली. या वेळी विधानसभा निवडणूक प्रमुख किरण ठाकरे, उपनगराध्यक्ष अशोक ओसवाल, कर्जत मंडल अध्यक्ष राजेश भगत, जिल्हा चिटणीस रमेश मुंढे, जिल्हा सरचिटणीस दीपक बेहेरे, शहराध्यक्ष विजय जिनगरे, संजय कराळे, नगरसेवक बळवंत घुमरे आदी उपस्थित होते.




अ‍ॅड. आशा भगत
मो.नं. ८१०८३५५०००

### जाहीर नोटीस

**पनवेल येथील मे. दिवाणी न्यायाधीश साहेब वरिष्ठ स्तर यांचे न्यायालयात**

दि.चौ.अ.क्र. ६९८/२०२३
निशाणी क्रमांक – नि. ८/ड

१. श्रीमती रजनी रविंद्र खताते .................. **अर्जदार**
वय ५१ वर्षे धंदा घरकाम
२. कुमारी कृतिका रविंद्र खताते .................. **अर्जदार**
उर्फ सौ. कृतिका ऋषिकेश वाजे
वय २५ वर्षे धंदा– शिक्षण
राहणार जे–१–१८ (५) स्पॅगीटी डी ए व्ही
शाळेजवळ सेक्टर १५, खारघर
तालुका पनवेल, जि रायगड ४१०२१०.

१. सदरहु अर्जदार क्र. १ यांचे पती व क्रमांक २ यांचे वडिल **कै.रविंद्र हरी खताते** हे दिनांक २३/०१/२०१८ रोजी सर्शुशा हॉस्पीटल मुंबई मयत झाले आहेत. **कै.रविंद्र हरी खताते** यांची आई **कै. हिराबाई हरी खताते** ही दिनांक २९/११/२०१८ गोवंडी येथे मयत झाली आहे.

**कै. रविंद्र हरी खताते** यांच्या पश्यात वरील अर्जदार यांची कायदेशीर वारस म्हणुन नोंद होणे अत्यंत गरजेचे आहे. सबब कै. रविंद्र हरी खताते यांना वरील अर्जदार हेच केवळ कायदेशीर वारस आहेत या व्यतिरिक्त अन्य कोणीही वारस नाहीत. सदरहु अर्जदार यांची वंशवेल येणेप्रमाणे

कै. हिराबाई हरी खताते (मयत मुळ पुरुषाची मयत आई)

कै. रविंद्र हरी खताते (मयत मुळ पुरुष) श्रीमती रजनी हरी खताते (मयत मुळ पुरुषाची पत्नी)

कुमारी कृतिका रविंद्र खताते उर्फ सौ. कृतिका ऋषिकेश वाजे (मयत मुळ पुरुषाची मुलगी)

२. सदरहु कै.रविंद्र हरी खताते यांच्या मृत्युसमयी त्यांच्या नावाची नोंद असलेल्या सदनीकेचे व दुकानाचे वर्णन येणेप्रमाणे :–

**१) मौजे कामोठे पनवेल येथिल दुकानाचे वर्णन**

| अपार्टमेंट क्र. | प्लॉट क्रमांक | सेक्टर क्रमांक | बाजार मुल्य |
|---|---|---|---|
| आवास को.हौ.सो.लि. दुकान क्रमांक ०५ | ८६/८७ | १९ | ८,८१,५००/– |

**२) मौजे खारघर, ता. पनवेल येथील सदनिकेचे वर्णन**

| अपार्टमेंट क्रमांक | प्लॉट क्रमांक | सेक्टर क्रमांक | बाजार मुल्य |
|---|---|---|---|
| स्पॅगीटी को.हौ.सो. येथील जे–१ येथील सिद्धीविनायक को.हौ.सो. सदनिका क्रमांक ५१८ | २२ | १५ | ९,००,०००/– |

३. सदरहू सदनिका कै. रविंद्र हरी खताते व सौ. रजनी रविंद्र खताते यांनी श्री. शाम बाबु कमला सिंग यांचे कडुन विकत घेतलेली होती. कै.रविंद्र हरी खताते व सौ. रजनी रविंद्र खताते है दिनांक २१/११/२००६ च्या खरेदी खताने दुय्यम निबंधक पनवेल यांचे कडे या सदनिकेचे पवल क्रमांक ८५३७/२००६ अन्वये मालक झालेले होते. व सदरहू दुकान कै. रविंद्र हरी खताते व सौ. रजनी रविंद्र खताते यांनी मे. आवास डेव्हलपर्स यांचे कडुन विकत घेतलेली होती. कै.रविंद्र हरी खताते व सौ. रजनी रविंद्र खताते हे दिनांक ३०/०६/२००८ च्या खरेदी खताने दुय्यम निबंधक पनवेल यांचे कडे या सदनिकेचे पवल कमांक ५११४ / २००८ अन्वये मालक झालेले होते.

४. परंतु सदरची व्यक्ती आजरोजी हयात नाही व अर्जदारांनी सिडको कार्यालयाकडे चौकशी केली असता असे सांगण्यात आले की, ज्यांच्या नावे मिळकत आहे व जर का ती व्यक्ती आजरोजी हयात नसेल तर त्यांच्या पश्चात म्हणजेच कै. रविंद्र हरी खताते यांचे कायदेशीर वारस म्हणून त्यांना सदर सदनिका हस्तातरण करणेसाठी मे. दिवाणी न्यायालयाचा वारस दाखला आणणे आवश्यक आहे. सदर कामी वारस दाखल्याच्या सुस्पष्टतेकामी कोणत्याही तांत्रीक बाबींचा अडथळा येवु नये हया कारणास्तव वरील मयत व्यक्तिंचे अर्जदार हेच कायदेशीर वारस असल्याचे जाहीर करुन मागत आहेत सबब सदर अर्जास कारण घडले आहे.

वरील मिळकतींबाबत अर्जदाराने वारस दाखला मिळणेबाबत अर्ज दिलेला आहे. तरी वरील वारसांचे दाखल्याबाबत ज्या कोणाचे हक्क, अधिकार, हितसंबंध अशी कोणत्याही प्रकारची तक्रार वगैरे असल्यास तशी लेखी हरकत सदरची नोटीस प्रसिध्द झाल्यापासुन ३० दिवसांचे आत या मे. न्यायालयात दाखल करावी. वरील पध्दतीने कोणाचीही हरकत न आल्यास अर्जदारांच्या विनंतीप्रमाणे वारसांचा वारस दाखला देण्यात येईल, त्यानंतर आलेल्या हरकतींचा विचार केला जाणार नाही ही नोटीस आज रोज़ी माझे सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिलेली आहे. दि. २३/०२/२०२४

**सही/–**
व. लिपीक दि.न्या.व.स्तर
पनवेल

कोर्टाचा शिक्का

**सही/–**
सहा.अधिक्षक (प्रशासन)
दि.न्या.व. स्तर पनवेल



### नमुना एन. डी.

(नियम ९२(३) पहा)
परवानाधारकाच्या उत्तराधिकाऱ्याने वृत्तपत्रात प्रसिद्ध करावयाच्या नोटीसीचा नमुना

लोकांच्या माहितीसाठी याद्वारे कळविण्यात येते की, परवाना क्र. MH/06/55/Uran/2003 मध्ये समाविष्ट असलेल्या मोटार वाहन क्र. MH46 BF 2147 चे मालक **दशरथ नारायण पाटील** यांचे तारीख २२/०५/२०२१ रोजी निधन झालेले आहे.

मी यमुना दशरथ पाटील, पत्ता : रा. ४२०, मोठे भोम जुई, रायगड ४१०२०६, महाराष्ट्र उपरोल्लेखित वाहनाच्या कब्जाचा उत्तराधिकारी असल्यामुळे सदर परवान्याचा वापर करण्याचा माझा इरादा आहे. आणि त्यानुसार, त्या परवान्याचे माझ्या नावावर हस्तांतरण होण्यासाठी मी योग्य त्या प्राधिकरणाकडे/प्रादेशिक परिवहन कार्यालयाकडे/प्रादेशिक परिवहन प्राधिकरणाकडे अर्ज केलेला आहे.

या बाबतीत कोणताही दावा सांगणाऱ्या किंवा हरकत असलेल्या कोणत्याही व्यक्तीने ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १५ दिवसांच्या आत असा दावा किंवा हरकत प्रादेशिक परिवहन कार्यालय पनवेलच्या/प्रादेशिक परिवहन प्राधिकरण पनवेलच्या निदर्शनास आणून दिली पाहिजे.

दि. २६/०२/२०२४

**उत्तराधिकाऱ्याचे नाव – यमुना दशरथ पाटील,**
**पत्ता : रा. ४२०, मोठे भोम जुई, रायगड ४१०२०६, महाराष्ट्र**



### नमुना एन. डी.

(नियम ९२(३) पहा)
परवानाधारकाच्या उत्तराधिकाऱ्याने वृत्तपत्रात प्रसिद्ध करावयाच्या नोटीसीचा नमुना

लोकांच्या माहितीसाठी याद्वारे कळविण्यात येते की, परवाना क्र. MH/46/CC/M-CAR/2019/157 मध्ये समाविष्ट असलेल्या मोटार वाहन क्र. MH46 BF 7704 चे मालक **प्रकाश नारायण पाटील** यांचे तारीख ०१/०५/२०२१ रोजी निधन झालेले आहे.

मी प्रतिक्षा प्रकाश पाटील, पत्ता : रा. ३५३, भोम जुई, रायगड ४१०२०६, महाराष्ट्र उपरोल्लेखित वाहनाच्या कब्जाचा उत्तराधिकारी असल्यामुळे सदर परवान्याचा वापर करण्याचा माझा इरादा आहे. आणि त्यानुसार, त्या परवान्याचे माझ्या नावावर हस्तांतरण होण्यासाठी मी योग्य त्या प्राधिकरणाकडे/प्रादेशिक परिवहन कार्यालयाकडे/प्रादेशिक परिवहन प्राधिकरणाकडे अर्ज केलेला आहे.

या बाबतीत कोणताही दावा सांगणाऱ्या किंवा हरकत असलेल्या कोणत्याही व्यक्तीने ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १५ दिवसांच्या आत असा दावा किंवा हरकत प्रादेशिक परिवहन कार्यालय पनवेलच्या/प्रादेशिक परिवहन प्राधिकरण पनवेलच्या निदर्शनास आणून दिली पाहिजे.

दि. २६/०२/२०२४

**उत्तराधिकाऱ्याचे नाव – प्रतिक्षा प्रकाश पाटील,**
**पत्ता : रा. ३५३, भोम जुई, रायगड ४१०२०६, महाराष्ट्र**



### ग्रामपंचायत वरवठणे

**ता. रोहा, जि. रायगड**

### निविदा सूचना

ग्रामपंचायत वरवठणे हद्दीतील खालील विकास कामे **ग्रा.पं. फंड/ १५ वित्त आयोग / जिल्हा वार्षिक योजना अंतर्गत** हाती घेतले. आहे. सदर कामास ग्रामपंचायत मासिक सभा व ग्रामसभेने प्रशासकीय मान्यता दिली असुन अंदाजपत्रकास मा. उपअभियंता (बांधकाम) उपविभाग रोहा व मा. उपअभियंता ग्रा.पा.पु. उपविभाग रोहा यांनी तांत्रिक मजुरी दिली असुन सदर काम करण्यासाठी शासनाकडे नोंदणीकृत ठेकेदाराकडून मोहोरबंद निविदा मागविण्यात येत आहे.

| कामाचे नाव | अंदाजपत्रकीय रक्कम | ठेकेदाराचा वर्ग | काम पूर्ण करण्याचा कालावधी | निविदा सादर करण्याची | | | ५% प्रतिभूमी रक्कम (सुरक्षा अनामत | कोरे निविदा फॉर्म फी |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | अंतिम तारीख | वेळ | ठिकाण | | |
| १) वरवठणे येथील प्राथमिक शाळा दुरुस्ती करणे. ता.रोहा (जि.वा.योजना) | ३,००,०००/– | अधिकृत | ६ महिने | ०४/०३/२०२४ | दु.४/०० वा. | ग्रा.पं. कार्यालय | १५,०००/– | १००/– |
| २) सुधीर भोय यांच्या घरापासुन ते तलावापर्यंत जमीन अंतर्गत गटार पाईप लाईन टाकणे. (१५ वित्त आयोग) | ७०,०००/– | अधिकृत | ६ महिने | ०४/०३/२०२४ | दु.४/०० वा. | ग्रा.पं. कार्यालय | ३,५००/– | १००/– |
| ३) श्री.कुशाराम भोय यांच्या घरापासून ते श्री.मोरु भोय यांच्या घरापर्यंत गटार लाईन टाकणे. (ग्रा.पं.फंड) | ६०,०००/– | अधिकृत | ६ महिने | ०४/०३/२०२४ | दु.४/०० वा. | ग्रा.पं. कार्यालय | ३,०००/– | १००/– |
| ४) वरवठणे स्मशानभूमी वर पाण्याची लाईन टाकणे. (ग्रा.पं. फंड) | ३०,६०५/– | अधिकृत | ६ महिने | ०४/०३/२०२४ | दु.४/०० वा. | ग्रा.पं. कार्यालय | १५३०/– | १००/– |
| ५) मुख्य कमान दुरुस्ती करणे (ग्रा.पं. फंड) | ४६,०००/– | अधिकृत | ६ महिने | ०४/०३/२०२४ | दु.४/०० वा. | ग्रा.पं. कार्यालय | २३००/– | १००/– |

**अटी व शर्ती :–**

१) कामाचे अंदाजपत्रक व आराखडे कार्यालयीन वेळेत पहावयास मिळतील आवश्यक असल्याने फी भरून त्याची प्रत उपलब्ध केले जातील.
२) प्राप्त निविदा दि.०५/०३/२०२४ रोजी सकाळी ११.३० वाजता ग्रामपंचायत कार्यालयात येथे उपस्थितांचे समक्ष मा. सरपंच यांच्या हस्ते उघडण्यात येतील.
३) निविदा भरणाऱ्या ठेकेदाराने आपले रजिस्टेशनचे दाखले हे सत्य प्रत केलेले असावेत.
४) कोणतीही एक अथवा अनेक निविदा कोणतेही कारण न देता नाकारण्याचा अधिकार सरपंच यांनी राखून ठेवला आहे.
५) देयकातून शासन नियमाप्रमाणे आयकर व उपकरीची कपात केली जाईल पंचायत समिती रोहा यांच्याकडील तांत्रिक अधिकारी व ग्रामपंचायतीचे पदाधिकारी / सदस्य यांचे मार्गदर्शन व देखरेखी खालील सदर काम करण्याचे असुन काम समाधान कारक नसेल तर ते त्याच स्थितीत थांबवून कार्यारंभ आदेश रद्द करण्याचा अधिकार ग्रामपंचायतीने राखून ठेवला आहे.
६) काम अंतिमरीत्या पुर्ण झाल्यानंतर सहा महिन्या नंतर देखभाल दुरुस्ती संबंधित ठेकेदार यांनी करण्याचे असून त्या नंतर सुरक्षा अनामत परत केली जाईल.
७) उपलब्ध निधी प्रमाणे बिल अदा केला जाईल.
८) निविदा पोस्टाने पाठविली जाणार नाही व दिलेल्या तारीख व वेळेपेक्षा उशिरा आलेली निविदा स्विकारली जाणार नाही.
९) निविदा किंमत ना परतावा समजावी.
१०) ५% अनामत रक्कम काम पुर्ण झाल्यानंतर देय अदा करताना कपात केली जाईल.
११) निविदा मंजूर केल्यास ५००/– रु. स्टँप पेपर वर करारनामा करून द्याना लागेल.

दि. २६/०२/२०१८
जावक क्र. १८४/२३–२४

**सही/–**
**ग्रामसेवक**
ग्रामपंचायत वरवठणे
ता.रोहा, जि. रायगड

**सही/–**
**सरपंच**
ग्रामपंचायत वरवठणे
ता.रोहा, जि. रायगड



### जाहीर नोटीस

तमाम लोकांस/जनतेस या जाहीर नोटीसी ने कळविण्यात येत आहे की, मौजे भिंगारवाडी, ता.पनवेल, जि. रायगड येथील **भगवान जैतू ठाकूर** यांचे नावे असलेली, ताबेकब्जातील तसेच मालकी हक्काची, भोगवटदार वर्ग २ प्रकारची शेतजमीन मिळकत कु.का. कलम प्रमाणे ४३ नियंत्रित सत्ता प्रकारची खालील वर्णनाची शेतजमिन मिळकत आमचे आशिलांनी खरेदीखताने विकत घेण्याचा विचार केलेला आहे.

**शेतजमिनीचे वर्णन**

मौजे भिंगारवाडी, तालुका. पनवेल, जि. रायगड.

| कब्जेदारांची नावे | सर्व्हे नं./ गट नं. | हिस्सा नं. | क्षेत्र हे.आर.पॉ. | आकार रू.पै. |
|---|---|---|---|---|
| भगवान जैतू ठाकूर | ८० | १ | ०–२३–८० पो.ख. ०–००–५० एकुण ०–२४–३० | ५.३१ |

सबब वर नमुद शेतजमिन मिळकतीवर, वा मिळकतीच्या कोणत्याही भागावर अन्य कोणाच्याही कोणत्याही प्रकारच्या हक्क हितसंबध, कुळ वहिवाट, ताबा कब्जा, इजमेंट, साठेकरार, फरोक्त, गहाण, दान, बोजा, बक्षीस, चार्ज, अ‍ॅटचमेंट, लीज एम.ओ.यु. वगैरे कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास ही नोटीस प्रसिध्द झालेपासून १० दिवसाच्या आत हक्क हितसंबंधाचे स्वरूप विषेद करून कागदोपत्री पुराव्यासह खालील सही करणार यांचे पत्त्यावर लेखी हरकती रजिस्टर्ड पोस्टाने दाखल कराव्यात अगर सक्षम येवून भेटावे वरील मुदतीत कोणाकडून काही लेखी हरकत तकार, दावा वगैरे न आल्यास सदर मिळकत निर्वेध व बोजारहित असून त्यावर कोणत्याही प्रकारची हरकत, तकार, दावा हितसंबंध नाही असे समजून आमचे अशिल सदर वर नमुद मिळकती चा व्यवहार पूर्ण करतील व त्यानंतर आलेल्या कोणत्याही प्रकारची हरकती, तकारी दावे आमचे आशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत व त्यासोडून दिल्या आहेत असे गृहित धरले जाईल याची तमाम लोकांनी / जनतेनी कृपया नोंद घ्यावी.

दिनांक : २७/०२/२०२४

**सही/ –**
**विजय भगत अ‍ॅन्ड असोशिएटस्**
(अ‍ॅडव्होकेट अ‍ॅन्ड लिगल कन्सलटंट)
शॉप नं. १२८, नगरपालीका शॉपिंग कॉम्प्लेक्स, पनवेल,
ता. पनवेल, जि. रायगड. मो. ९८२०६०७५७२/९३२२६५२३१९
Email.vijaybhagat43@gmail.com



### पनवेल महानगरपालिका

**जाहीरप्रकटन – शुद्धीपत्रक**

**महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम२ ०३ व २०५ अन्वये**

जा.क्र.पमपा/नरवि/रस्ते/२६–२४/प्र.क्र.०२/७२१/२०२४
दिनांक : २३/०२/२०२४

ज्याअर्थी, परिशिष्ट‘अ’ व परिशिष्ट ’ब’ मध्ये नमूद केलेल्या पनवेल महानगरपालिका हद्दीतील रस्ते बांधणे, सुस्थितीत राखणे व सुधारणे अंतर्गत महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमचे कलम २०५, २०६ व २०९ अन्वये मौजे– पनवेल, रोहींजण, पिसार्वे, करवले (बु.), तळोजे मजकूर व चाळ या गावांच्या बाहेरून नवीन सार्वजनिक रस्ते व अस्तित्वातील रस्त्याना जोडणारे नवीन रस्ते प्रस्तावित करून या कार्यालयाचे जाहीर प्रकटन जा. क्र.पमपा/नरवि/रस्ते/२६–२३/प्र.क्र.–०७/१२४७/२०२३, अन्वये महाराष्ट्र शासनाचे असाधारण राजपत्र क्र.५३, दि.३०/०५/२०२३ व दि.३१/०५/२०२३ च्या
दै. पुढारी व दै. वृत्तमानस या वृत्तपत्रात प्रसिद्धी देऊन वरील प्रकटन शासनाच्या राजपत्रात प्रसिद्ध झालेल्या दिनांकापासून ३० दिवसांच्या आत नागरिकांकडून हरकती व सूचना मागविण्यात आलेल्या आहेत;

आणि ज्याअर्थी,नागरिकांच्या प्राप्त हरकती व सूचनांच्या अनुषंगाने परिशिष्ट ‘अ’ व ‘ब’ मध्ये नमूद अ.क्र. १,२ व ३ मधील रस्त्यांची आखणी या कार्यालयाचे जाहीर प्रकटन जा. क्र.पमपा/नरवि/रस्ते/२६–२३/प्र.क्र.–०७/२५५०/२०२३, अन्वये महाराष्ट्र शासनाचे असाधारण राजपत्र क्र.६४, दि.२४/०७/२०२३ अन्वयेव दि.२५/०७/२०२३ च्या दै. सामना, दै. मुंबई तरुण भारत, दै. किल्ले रायगड व दै. रायगड नगरी या वृत्तपत्रात प्रसिद्धी देऊन अंतिम मान्यता देण्यात आली आहे;

आणि ज्याअर्थी, महाराष्ट्र शासन, नगरविकास विभाग, शासन निर्णय क्र. सिआयडी–३३१५/बैठक/प्र. क्र.५५/नवि–१०, दिनांक १०/०७/२०१७ अन्वये नवि मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ प्रकल्पाच्या प्रभाव क्षेत्रामधील मौजे–पारगाव कोळी आदिवासीवाडीचे कुटुंबाच्या पुनर्वसनासाठी सिडको महामंडळाने प्रस्तावित केल्यानुसार भूखंड क्र.६A, सेक्टर–१६, नवीन पनवेल (प.) हा भूखंड पुनर्वसनासाठी वाटप करण्यात आला आहे;

आणि ज्याअर्थी,या कार्यालयाचे जाहीर प्रकटन जा.क्र.पमपा/नरवि/रस्ते/२६–२३/प्र.क्र.–०७/२५५०/२०२३, अन्वये महाराष्ट्र शासनाचे असाधारण राजपत्र क्र.६४, दि.२४/०७/२०२३ अन्वये अंतिम मान्यता दिलेल्या परिशिष्ट ‘अ’ व ‘ब’ मध्ये नमूद अ.क्र. ३ च्या रस्त्याने उपरोक्त कोळी आदिवासीवाडीच्या पुनर्वसनासाठी दिलेल्या भूखंड क्र.६A, सेक्टर–१६, नवीन पनवेल(प.) या भूखंडाचे दोन भागात विभाजन होत असल्याने सदरचा रस्ता रद्द करणे आवश्यक आहे;

त्याअर्थी, मी गणेश देशमुख, आयुक्त, पनवेल महानगरपालिका मला प्राप्त अधिकारांन्वये परिशिष्ट ‘अ’ व ‘ब’ मध्ये नमूद अ.क्र. ३ मधील रस्त्याची आखणी रद्द करीत आहे. सदर परिशिष्ट ‘अ’ व परिशिष्ट ‘ब’ च्या प्रति नागरीकांच्या पाहणी करिता नगर रचना विभाग, पनवेल महानगरपालिका या कार्यालयात कार्यालयीन दिवशी व कार्यालयीन वेळेत नागरिकांच्या अवलोकनार्थ १ महिन्यांच्या कालावधीसाठी उपलब्ध राहील.

ठिकाण :– पनवेल.
दिनांक :–२३/०२/२०२४

**सही/–**
**(गणेश देशमुख)**
आयुक्त
पनवेल महानगरपालिका

जा.क्र. पमपा/जनसंपर्क/३१२४/प्र.क्र.१४८/१४८/२०२४



### PANVEL MUNICIPAL CORPORATION

**Public Notice– Corrigendum**

Maharashtra Municipal Corporation Act,1949 Section 203 & 205
No. PMC/TPD/ROADS/26-24/S.NO. / 02/721/2024
Date - 23/02/2024

And whereas, Panvel Municipal Corporation has published the Notice vide No. PMC/TPD/Roads/26-23/S.No.-07/1247/2023 in Maharashtra Government Extra-Ordinary Gazette No.53, dated 30th May 2023 and published in Daily Pudhari, Daily Vruttmanas newspapers on dated 31st May 2023 for inviting suggestions and objections to the said proposed alignment in the revenue villages Mouje-Panvel, Rohinjan, Pisarve, Karavale (Bk.), Taloje Majkur, Ghot and Chal etc. as per the provisions under section 205, 206 and 209 of Maharashtra Municipal Corporation Act, 1949 shown in Schedule ‘A’ and Schedule ‘B’;

And whereas, in pursuance of suggestions and objections received by public regarding the proposed roads Sr. No-1, 2 & 3 mentioned in Schedule ‘A’ and Schedule ‘B’, Panvel Municipal Corporation has sanctioned the roads vide No. PMC/TPD/Roads/26-23/S.No.-07/2550/2023 in Maharashtra Government Extra-Ordinary Gazette No.64, dated 24thJuly 2023 and published in Daily Samana, Daily Mumbai Tarun Bharat, Daily Kille Raigad and Daily Raigad Nagari newspapers on dated 25th July 2023;

And whereas, the Plot No-6A, Sector-16, New Panvel (W) is allotted by State Government, Urban Development Department for resettlement of Mouje Pargaon Koli Adivasi Wadi located in Navi Mumbai International Airport Notified Area vide Government Resolution No-CID-3315/Meeting/S. No-55/UD-10, Dated-10/07/2017;

And whereas, the sanctioned road of Sr. No-3 mentioned in Schedule ‘A’ and Schedule ‘B’ of Maharashtra Government Extra-Ordinary Gazette No.64, dated 24th July 2023 needs to deleted/cancelled as the Plot No-6A, Sector-16, New Panvel (W) allotted for resettlement of Mouje Pargaon Koli Adivasi Wadi is divided into two parts;

Therefore, as per the powers delegated by Panvel Municipal Corporation to the Commissioner, Panvel Municipal Corporation and in exercise of the powers, I, Ganesh Deshmukh, Commissioner, Panvel Municipal Corporation hereby deletes/cancels the proposed road Sr.No-3 mentioned in Schedule ‘A’ and Schedule ‘B’ is kept open for the inspection of general public on all working days and in working hours in the office the of the Town Planning Department, Panvel Municipal Corporation for a period of one month.

Panvel.
Date: - 23 /02/2024

Sd/-
(Ganesh Deshmukh)
Commissioner
Panvel Municipal Corporation

जा.क्र. पमपा/जनसंपर्क/३१२४/प्र.क्र.१४८/१४८/२०२४

## निवडक

### चेंबूरमध्ये आज 'निधी तुमच्याजवळ'

**नवी मुंबई :** कर्मचारी भविष्य निर्वाह निधी संघटना, प्रादेशिक कार्यालय, वाशी किंवा बार पीएफ खातेधारक, नव्याने समाविष्ट संस्था आणि निवृत्तीवेतनधारक यांच्या समस्या सोडवण्यासाठी आरसीएफ चेंबूर येथे या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. २७ फेब्रुवारी २०२४ रोजी हा कार्यक्रम होणार आहे. पीएफ खातेदारक, विविध संस्था आणि पेन्शनधारकांना वाशी येथे यावे लागणार नाही. अधिकारी जे.पी. चौहान यांनी सांगितले की; आम्ही ग्राहकांच्या हितासाठी हे उपक्रम राबवत आहोत. पेन्शन धारक नागरीकांना वाशी येथे यावे लागू नये यासाठी आम्ही प्रत्येक विभागात हे कार्यक्रम घेत असून त्यास उत्तम प्रतिसाद लाभत आहे.

### चिरनेरला स्वच्छता अभियान

**उरण :** संत निरंकारी सत्संग मिशन यांच्या समाजिक प्रबोधनच्या माध्यमातून संत निरंकारी स्वच्छता अभियान अंतर्गत रविवारी (दि. २५) सत्संग मिशनच्या उरण पूर्व विभागातर्फे स्वच्छता मोहीम राबविण्यात आली. यामध्ये प्रामुख्याने सोरला तलाव परिसराची स्वच्छता करण्यात आली. तसेच येथील रस्त्यांचीही स्वच्छता करण्यात आली. या स्वच्छता अभियानात सत्संगच्या बंधु भगिनी, ज्येष्ठ नागरिक, तरुण युवक युवतींनी आपला सहभाग नोंदवून स्वच्छता अभियान यशस्वी करण्यात मदत केली.



# 'सीकेटी'त इतिहास विभागाद्वारे आंतरराष्ट्रीय परिषद

## विविध महाविद्यालये, विद्यापीठांतून ९२ प्राध्यापक आणि संशोधकांची उपस्थिती

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या खांदा कॉलनीमधील चांगू काना ठाकूर (सीकेटी) आर्ट्स, कॉमर्स ॲण्ड सायन्स (स्वायत्त) महाविद्यालयात इतिहास विभाग आणि आय.क्यू. ए. सी. यांनी संयुक्त विद्यमाने राष्ट्रीय उच्चतर शिक्षा अभियान (रुसा) अंतर्गत शुक्रवारी (दि. २३) सामाजिक शास्त्रे, मानव्यविद्या आणि शिक्षण क्षेत्रातील नवीन प्रवाह (Recent Ternds in Social Science,Humanities and Education) याविषयावर आंतरराष्ट्रीय परिषदेचे आयोजन करण्यात आले.

या आंतरराष्ट्रीय परिषदेसाठी मॉरिशियस विद्यापीठातील समाजशास्त्रज्ञ प्रो. राजेन सुंटू, पुत्र मलेशिया विद्यापीठातील इंग्रजी विभागातील प्राध्यापिका प्रो. मनीमांगी मानी, जवाहरलाल नेहरू विद्यापीठाच्या ऐतिहासिक अभ्यास केंद्रातील प्राध्यापक प्रो.उमेश कदम आणि मिझोरम विद्यापीठातील इतिहास आणि मानववंश विज्ञान विभागाचे प्राध्यापक प्रो. किशोर गायकवाड हे प्रमुख वक्ते लाभले होते.

या परिषदेचा उद्घाटन समारंभ मॉरिशियस विद्यापीठातील समाजशास्त्रज्ञ प्रो. राजेन सुंटू, जवाहरलाल नेहरू



विद्यापीठाच्या ऐतिहासिक अभ्यास केंद्रातील प्राध्यापक प्रो.उमेश कदम यांच्या प्रमुख उपस्थितीत झाला. या वेळी महाविद्यालयाचे प्राचार्य प्रो.डॉ. एस. के. पाटील, आय.क्यू. ए. सी. समन्वयक प्रो. डॉ. बी. डी. आघाव, रुसा समन्वयक डॉ.एस.एन.वाजेकर,कला शाखा प्रमुख प्रो. डॉ. बी.एस.पाटील उपस्थित होते. या वेळी महाविद्यालयाच्या प्रचार्यांनी महाविद्यालयाच्या प्रगतीची माहिती दिली. तसेच परिषदेच्या निमंत्रिका व इतिहास विभागप्रमुख डॉ. रत्नप्रभा म्हात्रे यांनी परिषदेचे प्रास्ताविक केले तर प्रो.डॉ. बी. डी. आघाव यांनीप्रमुख पाहुण्यांची ओळख करून दिली. त्यानंतर प्रमुख पाहुणे समाजशास्त्रज्ञ प्रो. राजेन सुंटू यांनी बीजभाषण दिले.

या उद्घाटन समारंभाचे सूत्रसंचालन डॉ. आर. व्ही. येवले यांनी केले, तर रुसा समन्वयक डॉ. एस. एन. वाजेकर यांनी आभारप्रदर्शन केले. त्यानंतर झालेल्या सत्रामध्ये प्रो. मनीमांगी मानी यांनीसाहित्य क्षेत्रातील जागतिक पातळीवरील नवीन प्रवाह या विषयावर व्याख्यान दिले, तर प्रो.उमेश कदम यांनी वैचारिक सुसूत्रता:सामाजशास्त्रातील अध्यापनशास्त्रीय आव्हाने, प्रो. किशोर गायकवाडयांनीजागतिक इतिहास आणि सार्वजनिक इतिहासाच्या विशेष संदर्भासह इतिहासलेखनातील अलीकडील प्रवाह या विषयांवर व्याख्याने देऊन उपस्थितांना उद्बोधित केले. त्यानंतर झालेल्या शोधनिबंध सादरीकरणच्या सत्रात २२संशोधकांनी शोधनिबंधांचे वाचन केले. तसेच या परिषदेसाठी विविध महाविद्यालये, विद्यापीठांतून ९२ प्राध्यापक आणि संशोधक उपस्थित होते.

### मराठे कालीन नाण्यांचेही प्रदर्शन

आंतरराष्ट्रीय परिषदेचे औचित्य साधून पुरातन नाणी संग्राहक व प्रदर्शक प्रशांत ठोसर यांनी मराठे कालीन नाण्यांच्या प्रदर्शनाचे आयोजन केले व त्यामाध्यमातून शिवकालीन इतिहासाला उजाळा देण्यात आला. या आंतरराष्ट्रीय परिषदेचे यशस्वी आयोजन करण्याकरिता महाविद्यालयाच्या प्राचार्यांच्या मार्गदर्शनाखाली इतिहास विभागप्रमुख डॉ. रत्नप्रभा म्हात्रे आणि प्रा. भावेश भोईर आणि इतिहास विभागाच्या विद्यार्थ्यांनीअथक परिश्रम घेतले.

या आंतरराष्ट्रीय परिषदेचा सांगता समारंभ शुक्रवारी झाला. या वेळी एसआयसीइएस कॉलेज ऑफ आर्ट्स, सायन्स अँड कॉमर्स, अंबरनाथच्या प्राचार्या प्रो. डॉ. स्वप्ना समेळ, दूर व मुक्त अध्ययन विभागाचे सहसंचालक प्रा. अनिल बनकर हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. या वेळी प्रो.डॉ. स्वप्ना समेळ यांनी शिक्षण क्षेत्रातील बदलते प्रवाह आणि नवीन शैक्षणिक धोरण,२०२० च्या अनुषंगाने शिक्षणक्षेत्रातील बदल या विषयावर माहिती दिली. तद्नंतर परिषदेच्या निमंत्रिका व इतिहास विभागप्रमुख डॉ. रत्नप्रभा म्हात्रे यांनी संपूर्ण परिषदेचा आढावा घेतला. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन गौरी सुंबे आणि जसप्रित कौर या इतिहास विभागाच्या विद्यर्थीनींनी केले तर आभारप्रदर्शन प्रा. भावेश भोईर यांनी केले.

या आंतरराष्ट्रीय परिषदेचे यशस्वी आयोजन केल्याबद्दल महाविद्यालयाचे प्राचार्य प्रो. डॉ.एस. के. पाटील,आय. क्यू. ए. सी. समन्वयक प्रो. डॉ. बी. डी. आघाव, रुसा समन्वयक डॉ. एस. एन. वाजेकर यांनी शुभेच्छा दिल्या. तसेच महाविद्यालयातील सर्व विद्याशाखांचे प्रमुख, विविध विभागाचे प्रमुख आणि सर्व प्राध्यापक वर्गाने या आंतरराष्ट्रीय परिषदेच्या आयोजनासाठी शुभेच्छा दिल्या.

या आंतरराष्ट्रीय परिषदेचे यशस्वी आयोजन केल्याबद्दल जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे चेअरमन व माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, अध्यक्ष अरुणशेठ भगत, व्हाईस चेअरमन वाय. टी. देशमुख, आमदार प्रशांत ठाकूर आणि सचिव मा. डॉ. एस. टी. गडदे यांनी इतिहास विभागाचे कौतुक केले.

# सदाबहार दोस्ती ग्रुपतर्फे वीटभट्टी कामगारांना वस्तू



**उरण : बातमीदार, वार्ताहर**

आकाश फाउंडेशनच्या मुंबई सेक्रेटरी संजीवनी ताई शृगारे मॅडम यांच्यातर्फे दिलेले सामान कासारभट वीट भट्टी वर काम करणाऱ्या कामगारांना सदाबहार दोस्ती ग्रुप तसेच सारडे विकास मंचच्या माध्यमातून वाटप करण्यात आले.

या कार्यक्रमा वेळी आकाश फाऊंडेशन मुंबई तर्फे दिलेले साहित्य कासारभट विट भट्टी मधील कामगारांना वाटप करण्यात आले. या वेळी महिला वर्ग तसेच लहान मुले यांना कपडे खाऊ खेळणी चप्पल ब्लँकेट आशा वस्तू वाटप करण्यात आले. कार्यक्रमास सदाबहार दोस्ती ग्रुपचे हरिश्चंद्र म्हात्रे, संजीवनी म्हात्रे कैलास पाटील, तृप्ती पाटील, तुकाराम गावंड संतोष जोशी,वैशाली जोशी, विजय गावंड, विजया गावंड, जितेंद्र म्हात्रे,मीना म्हात्रे, सचिन पाटील, ममता पाटील, कामेश्वर म्हात्रे यांचे मोलाचं सहकार्य लाभले.

या कार्यक्रमास सुयश क्लासेस आवरे अध्यक्ष निवास गावंड, सचिन पाटील आवरे, शंकर पाटील आवरे, सारडे विकास मंच अध्यक्ष नागेंद्र म्हात्रे, रुपाली म्हात्रे, स्नेहीत पाटील हे उपस्थित होते. वीट भट्टी कामगारांच्या चेहऱ्यावरील हास्य पाहण्यात काही वेगळीच मजा अनुभवयास मिळाली. सर्वांचे सारडे विकास मंच अध्यक्ष नागेंद्र म्हात्रे तसेच तुकाराम गावंड यांनी आभार मानले.

# उरण महाविद्यालयाला राज्यस्तरीय पुरस्कार

**उरण : रामप्रहर वृत्त**

महाराष्ट्र राज्य उच्च व तंत्र शिक्षण विभाग व महाराष्ट्र माहिती तंत्रज्ञान केंद्र यांच्या संयुक्त विद्यमाने करिअर कट्टा युवकांच्या सर्वांगीण विकासासाठी संपूर्ण महाराष्ट्रभर सर्व महाविद्यालयांमध्ये हा उपक्रम चालवला जातो. या उपक्रमावरूनच कोकण ज्ञानपीठ उरण वाणिज्य व कला महाविद्यालयास पुढील पुरस्कार प्राप्त झाले आहेत.

१.उत्कृष्ट विभागीय महाविद्यालय द्रितीय क्रमांक, २.उत्कृष्ट जिल्हास्तरीय महाविद्यालय प्रथम क्रमांक ३.उत्कृष्ट जिल्हास्तरीय करिअर संसद प्रथम क्रमांक आणि ४. डॉ.एच.के.जगताप यांना जिल्हा



समन्वयक म्हणून विशेष सन्मान इत्यादी पुरस्कार प्राप्त झालेले आहेत. महाविद्यालयांमध्ये अनेक विविध उपक्रम चालवले जातात, या उपक्रमाच्या आधारे संपूर्ण महाराष्ट्रातून अशा प्रकारचे पुरस्कार काढले जातात आणि महाराष्ट्र शासनाच्या बक्षीस समारंभ कार्यक्रमामध्ये हे पुरस्कार देण्यात येतात.

अशाच प्रकारचा कार्यक्रम रविवारी (दि. २५) के. जे. सोमय्या महाविद्यालय विद्या विहार मुंबई या ठिकाणी आयोजित केला होता. याच कार्यक्रमांमध्ये महाविद्यालयाला वरील पुरस्कार देण्यात आले. पुरस्कार घेण्यासाठी महाविद्यालयाचे प्राचार्य के. ए. श्यामा सर, आयक्यूएसी कोऑर्डिनेटर डॉ. ए. आर. चव्हाण सर आणि करियर कट्टाचे कॉर्डिनेटर डॉ. एच. के. जगताप उपस्थित होते. सदर उपक्रम वर्षभर चालवण्यासाठी महाविद्यालयाचे प्राचार्य के. ए. शामा सर यांचे मार्गदर्शन लाभले. महाविद्यालयाचे करिअर कट्टाचे समन्वयक म्हणून डॉ. एच. के. जगताप काम पाहतात. कोकण ज्ञानपीठ संस्थेचे सर्व पदाधिकारी, महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी यांचे बहुमूल्य मार्गदर्शन लाभले. संपूर्ण स्तरावरून महाविद्यालयाचे सर्वत्र अभिनंदन होत आहे.

# विकी देशमुख टोळीचा फरार आरोपी अखेर जेरबंद

**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**

कुख्यात संघटीत गुन्हेगार विक्रांत देशमुख यांच्या टोळीतील साथीदारास नवी मुंबई गुन्हे शाखेने जेरबंद केले आहे. गेल्या चार वर्षांपासून तो फरार होता.

राकेश जनार्दन कोळी असे अटक आरोपीचे नाव आहे. तो विकी देशमुख उर्फ विक्रांत देशमुख टोळीतील सदस्य आहे. अपहरण, बलात्कार, हत्या, हत्येचा प्रयत्न, खंडणी, असे अनेक गंभीर गुन्ह्यात त्याचा सहभाग होता. शिवाय महाराष्ट संघटित गुन्हेगारी नियंत्रण कायद्यानुसार त्याच्यावर कारवाई करण्यात आली आहे. विकी देशमुख टोळीतील एका सदस्यांची हत्या करण्यातही त्याचा सहभाग असल्याचा दावा पोलिसांनी केला आहे.

गेल्या चार वर्षांपासून तो फरार होता. उरण गव्हाणपाडा, जेएनपीटी, पनवेल परिसरात या टोळीची दहशद होती. विकी देशमुखच्या टोळीतील त्याच्या सहित १० पेक्षा जास्त आरोपींना जेरबंद करण्यात आले होते, मात्र राकेश पोलिसांच्या हाती लागत नव्हता. रविवारी तो गव्हाण फाटा परिसरात आला असल्याची माहिती गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक डी.जी. देवडे यांना मिळाली होती. या माहितीच्या आधारावर गुन्हे शाखेचे पोलीस उपायुक्त अमित काळे यांनी तत्काळ पथक पाठवले. या पथकाने सापळा रचून राकेश याला अटक केली आहे.

# खारघरच्या रामशेठ ठाकूर महाविद्यालयात टेक्नो ब्रिंक २०२४

**खारघर : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे खारघर येथे रामशेठ ठाकूर वाणिज्य व शास्त्र महाविद्यालयात माहिती व तंत्रज्ञान विभाग तसेच कम्प्युटर सायन्स यांच्या संयुक्त विद्यमाने टेक्नो ब्रिंक २०२४चे आयोजन सोमवारी (दि. २६) केले होते.

या टेक्नो ब्रिंक २०२४ चा प्रमुख हेतू विद्यार्थ्यांमधील तांत्रिक ज्ञानाला वाव देऊन त्याचा आधुनिक युगामध्ये जास्तीत जास्त वापर करणे हा होता. टेक्नो ब्रिंक २०२४ च्या अंतर्गत ऑटो एक्सपोच्या माध्यमातून वेगवेगळ्या कंपनीच्या सुमारे १५३ चार चाकी वाहनाचे तसेच दुचाकी वाहनांचे दुर्मिळ मॉडेल्स व कसरतीही





दाखवण्यात आल्या तसेच वेगवेगळ्या स्पर्धा घेण्यात आल्या होत्या त्यामध्ये प्रामुख्याने ट्रेझर हंट, डिबेट मॉडेल मेकिंग, काहुत क्विझ, डेबुगीग, एन एफ एस, इत्यादी स्पर्धांचा समावेश होता. या सर्व स्पर्धांमध्ये नवी मुंबईमधील वेगवेगळ्या महाविद्यालयातील सुमारे ७० विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग घेतला व या स्पर्धेचा निकाल ही जाहीर करण्यात आला. जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे व्हाईस चेअरमन वाय टी देशमुख यांनी या टेक्नो ब्रिंकच्या उद्घाटनासाठी प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहून सर्व विजेतांना प्रशस्तीपत्रक व सन्मानचिन्ह देऊन गौरविण्यात आले.

महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. रूपेंद्र गायकवाड यांनी सर्व विजेत्यांचे अभिनंदन केले व पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या. या टेक्नो ब्रिंक २०२४ चे आयोजन प्रा. स्नेहा लोखंडे विभाग प्रमुख माहिती व तंत्रज्ञान व कम्प्युटर सायन्स यांनी केले तसेच प्राध्यापक डॉ. महेश्वरी झिरपे, समन्वयक अंतर्गत गुणवत्ता सिद्धता कक्ष, माहिती व तंत्र विभागातील सर्व विद्यार्थी व विद्यार्थिनी तसेच प्रा. राजश्री म्हात्रे, प्रा. रिजवाना मोमीन, प्रा. शाहीन मुल्ला, प्रा. राणी शेख, प्रा. महेश धायगुडे, दीपक पवार, प्रा. श्रद्धा कारवा, प्रा. श्रद्धा मोरे, ओमकार पाटील, अनंत सावंत तसेच इतर सर्व प्राध्यापक वृंद व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी उपस्थित राहून सहकार्य केले.

# नेरूळमधील वीज चोरी महावितरणने पकडली



**मुंबई : प्रतिनिधी**

महावितरणच्या नेरूळ विभागातर्फे वीज चोरीला आळा बसावा यासाठी नियमितपणे मोहीमा राबविण्यात येतात फेब्रुवारीमध्ये राबविण्यात आलेल्या वीज चोरी मोहिमेदरम्यान नेरूळ विभागातील अधिकारी कर्मचाऱ्यांनी घरगुती ग्राहकाची वीज चोरी पकडण्याची उल्लेखनीय कामगिरी केली.

नेरूळ उपविभागाच्या शाखा कार्यालय-१ चे शाखा अभियंता आशिष इंगळे यांचा अनेक दिवसांपासून संशयित ग्राहकाच्या वीज वापरावर लक्ष ठेवून होते. ही बाब त्यांनी नेरूळ उपविभागाचे अतिरिक्त कार्यकारी अभियंता विनायक बुधवंत यांच्या निदर्शनास आणून दिली. तद्नंतर विनायक बुधवंत यांच्या नेतृत्वाखाली दोन पथके करावे गावामध्ये राहणाऱ्या ग्राहकाच्या घरी धाडण्यात आली. ग्राहकाने शक्कल लावून फोटो फ्रेमच्या मागे चेंजओव्हर स्विच दडवला होता ज्यावर ४ एसीचा वापर आढळून आला. अभियंता, अविनाश आभाळे, कृष्णात् पाटील व सारिका अष्टनकर यांनी सागर पाटील, प्रवीण दानव व महिला कर्मचारी स्वाती लाड या टीमसोबत दीड तास प्रयत्नांची पराकाष्ठा करून तो स्विच शोधून काढला व ग्राहकाने चलाखीने केलेली ८.२१ लाखांची वीजचोरी मोठ्या शिताफीने पकडली. तसेच शाखा अभियंता आशिष इंगळे यांनी ८,२१,५३० रुपयांचा दंडही ग्राहकाकडून वसूल केला.

भांडुप परिमंडलाचे मुख्य अभियंता सुनील काकडे व वाशी मंडळाचे प्रभारी अधीक्षक अभियंता सिंहाजीराव गायकवाड यांचेकडून विनायक बुधवंत व सर्व टीमचे अभिनंदन करण्यात आले तसेच भविष्यात अशीच कामगिरी करण्यासाठी प्रोत्साहन देण्यात आले. महावितरण कडून वीज चोरी रोखण्यासाठी सुरू असलेली मोहीम कायमस्वरूपी राबविण्यात येणार असून सर्व ग्राहकांना आवाहन करण्यात येते कि कोणत्याही आमिषाला बळी पडून वीज चोरी करू नका, सन्मानाने वीज बिल भरून समाजात नाहक होणारी बदनामी टाळा अन्यथा विद्युत कायदा २००३ नुसार फौजदारी कारवाईला सामोरे जावे लागेल.

# गव्हाण विद्यालयात स्वातंत्र्यवीर सावरकरांना आदरांजली

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

श्री छत्रपती शिवाजी विद्यालय व जनार्दन आत्माराम भगत ज्युनिअर कॉलेज गव्हाण कोपर येथे स्वातंत्र्यवीर विनायक दामोदर सावरकर यांची ५८ वी पुण्यतिथीनिमित्त विनम्र अभिवादन करण्यात आले. हा कार्यक्रम इयत्ता आठवी क च्या वर्गातर्फे आयोजित करण्यात आला होता.

या वेळी वर्गशिक्षिका व्ही. जी. म्हात्रे यांनी व्यवस्थित नियोजन करून कार्यक्रम केला. या वेळी विद्यालयाचे उपप्राचार्य पी. बी. मंडले तसेच रयत शिक्षण संस्थेचे लाईफ मेंबर आर. एस. भोईर यांच्या हस्ते प्रतिमेस पुष्पहार अर्पण करण्यात आला. या वेळी गव्हाण ग्रामपंचायत सदस्या योगिता भगत यांच्या हस्ते श्रीफळ वाढवण्यात आला. या कार्यक्रमास भागुबाई



चांगू ठाकूर लॉ कॉलेजच्या विद्यार्थिनी म्हणून योगितााताई भगत, माजी विद्यार्थिनी कुमारी प्रणाली ठाकूर तसेच दिव्या म्हात्रे यांचीही उपस्थिती लक्षवेधी होती.

या वेळी डी. के. म्हात्रे, सी.जी. मढवी आणि सर्व रयत सेवकांनी आपली उपस्थिती दाखवली. विद्यालयाचे कलाशिक्षक जी.जी. भोईर यांनी फलक लेखन केले. तर कार्यक्रमाचे सूत्रसंचालन एच. आर. पाटील यांनी केले. त्याचप्रमाणे इयत्ता पाचवी ते आठवीच्या विद्यार्थ्यांनी सावरकरांबद्दल आपले मनोगत सांगून त्यांना विनम्र अभिवादन केले. या वेळी इयत्ता पाचवीतील कार्तिक सुनील घोडके, रिकी प्रदीप कुमार, स्नेहा उमेश शेट्टी, इयत्ता सातवीतील कुमारी दिव्या बालाजी केंद्रे, इयत्ता आठवीच्या शुभ प्रविण कोळी यांनी आपले मनोगत व्यक्त केले. या वेळी कार्यक्रमाच्या कार्यक्रमाची सांगता व्ही.जी म्हात्रे यांच्या आभार प्रदर्शनाने झाली.

## निवडक




### चौक सरपंच रितु ठोंबरे सन्मानित

**चौक** : ग्रुप ग्रामपंचायत चौकच्या विद्यमान सरपंच रितु सुधीर ठोंबरे या आदर्श सरपंच या पुरस्काराने खालापूर प्रेस क्लब यांच्याकडून खासदार श्रीरंग बारणे यांच्या हस्ते सन्मान करण्यात आला. खालापूर प्रेस क्लबचा वर्धापन दिन मोठ्या उत्साहाने साजरा करण्यात आला. या वेळी खासदार श्रीरंग बारणे, आमदार महेंद्र थोरवे, माजी नगराध्यक्ष डॉ. सुनील पाटील, राजिप माजी उपाध्यक्ष सुधाकर घारे, ज्येष्ठ नेते विजय पाटील, दत्ताजी मसुरकर, माजी नगरसेवक अमोल जाधव यांच्या उपस्थितीत पुरस्कार प्रदान करण्यात आला.

### कापडे बुद्रुक येथे श्रीवरदायिनी यात्रा

**पोलादपूर** : तालुक्यातील कापडे बुद्रुक येथील श्रीवरदायिनी मंदिराचा यात्रोत्सव मंगळवारी (दि.२७)



आयोजित करण्यात आला आहे. श्रीवरदायिनी देवीचा वार मंगळवार असताना यंदाची यात्रादेखील मंगळवारी भरत असल्याने भक्तांची मांदियाळी असणार आहे. ग्रुप ग्रामपंचायतीतर्फे या यात्रोत्सवासाठी विविध सोयी सुविधांचे आयोजन केले जात असून कोणताही अनुचित प्रकार घडू नये, म्हणून पोलादपूर पोलिसांचा कडेकोट बंदोबस्त असतो. सातारा जिल्ह्यातील पार तथा पार्वतीपूर येथील श्रीरामवरदायिनी देवीनंतर पोलादपूर तालुक्यातील श्रीवरदायिनी देवी कापडे बुद्रुक येथे असून काटेतळी येथे श्रीरामवरदायिनी आहे.

### पाटणसईत रंगणार कव्वालीचा मुकाबला

**नागोठणे** : नागोठणेजवळील पाटणसई ग्रामपंचायत हद्दीतील गोडसई येथे सालाबादप्रमाणे हजरत सय्यद बालेपीर शाहबाबा यांच्या उरूसचे मंगळवारी (दि. २७) आयोजन करण्यात आले आहे. बुधवारी (दि. २८) रात्री १० वाजता प्रसिद्ध कव्वाल छोटे माजिद शोला (किंग ऑफ गझल) व प्रसिद्ध कव्वाल जानी शैदा (किंग ऑफ गझल) यांच्यात जंगी मुकाबला होणार आहे. या ६०व्या उरूस उत्सवात सर्व नागरिकांनी सहभाग व्हावे, असे आवाहन दर्गाचे तत्कालीन पुजारी मरहूम लियाकतबाबा मांडलेकर यांचे सुपुत्र दिलावर मांडलेकर व अलिमभाई मांडलेकर यांनी केले आहे.

### संजय राऊत यांना पुरस्कार



**अलिबाग** : येथील सनदी लेखापाल संजय राऊत यांना ग्लोबल इकॉनॉमिक्स प्रोग्रेस अँड रिसर्च असोसिएशन नवी दिल्ली यांच्यातर्फे राष्ट्रीयस्तरावरील भारतरत्न डॉ. अब्दुल कलाम पुरस्कार देऊन गौरविण्यात आले. सुवर्णपदक, सन्मानचिन्ह व प्रमाणपत्र असे या पुरस्काराचे स्वरूप आहे. सामाजिक, शैक्षणिक व आर्थिक क्षेत्रातील योगदानाबद्दल व कामगिरीबद्दल संजय राऊत यांची राष्ट्रीय स्तरावरील भारतरत्न डॉ. अब्दुल कलाम सुवर्णपदक पुरस्कारासाठी निवड करण्यात आली होती. ग्लोबल इकॉनॉमिक्स प्रोग्रेस अँड रिसर्च असोसिएशन नवी दिल्ली यांच्यातर्फे हा पुरस्कार देण्यात येतो. चेन्नई येथे आयोजित समारंभात संजय राऊत यांना हा पुरस्कार प्रदान करण्यात आला.

# पेणमध्ये हजारो लाभार्थ्यांना शिधा वाटपाचा लाभ

**पेण : प्रतिनिधी**

रेशानिंग दुकानांमधून शासनाच्या वतीने शिधा वाटप करण्यात येत आहे. पेण तालुक्यात पुरवठा विभागाकडे आलेल्या या शिधा वाटपाच्या टप्प्यात आतापर्यंत ३९,९२१ लाभार्थ्यांना शिधावाटप करण्यात आले आहे. तालुक्यातील जवळपास ९० टक्के लाभार्थ्यांना शिधावाटप करण्यात पुरवठा विभागाला यश प्राप्त झाले आहे.

गौरी गणपती, दिवाळी, गुढीपाडवा यांसारख्या महत्त्वाच्या सण वारांचे औचित्य साधून शासनाने गोरगरीब आणि दारिद्र्यरेषेखालील कुटुंब जीवनावश्यक वस्तू खरेदी करू शकत नाहीत. अशांसाठी आधार म्हणून या शिधा वाटपाच्या कार्यक्रमाचा निर्णय शासनाने घेतला आहे. ज्या



लाभार्थ्यांची, ग्राहकांची किंवा कुटुंबीयांची शासन दरबारी नोंद असते अशा लाभार्थ्यांना या शिधा वाटपाचा लाभ घेता येतो. त्यामुळे तळागाळातील

## अंत्योदय कार्डधारकांना लवकरच साड्यांचे वाटप

गरीब कुटुंब तसेच आदिवासी बांधव याचा चांगल्या प्रकारे लाभ घेत आहेत.

नागरिकांना अवघ्या १०० रुपयांमध्ये एक अर्धा किलो रवा, पोहे, मैदा, चणाडाळ, साखर आणि एक किलो तेल अशा प्रकारचा शिधा केशरी आणि पिवळ्या रंगाच्या रेशनकार्ड धारकांना वाटप करण्यात येत आहे. तालुक्यातील ३९,९२१ लाभार्थ्यांना याचा लाभ मिळणार असून तालुक्यातील ११६ रेशनिंग दुकानांमार्फत आत्तापर्यंत जवळपास ९० टक्के लाभार्थ्यांना हा शिधा वाटप करण्यात आला असल्याची माहिती तालुका पुरवठा अधिकारी सुरेश थळे यांनी दिली आहे.

### अंत्योदय लाभार्थी महिलांना मिळणार साड्या

शासनाने १० नोव्हेंबर २०२३ रोजी घेतलेल्या निर्णयानुसार आता अंत्योदय रेशनकार्डधारकांना प्रत्येक रेशनकार्ड मागे एका साडीचे वाटप करण्यात येणार आहे. त्यामुळे शासनाकडून महिलांना प्राधान्य देऊन महिलांसाठी ही आणखी एक नवी पर्वणी ठरणार आहे. २६ जानेवारी ते होळी उत्सव या कालावधीत हे साडी वाटप करण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे.

# कर्जतमध्ये भाजपच्या ग्रामपरिक्रमेला उत्स्फूर्त प्रतिसाद

**कर्जत : प्रतिनिधी**

भाजपने कर्जत तालुक्यात ग्रामपरिक्रमा सुरू केली आहे. या यात्रेला शेतकरी व ग्रामस्थांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत आहे. या यात्रेत ग्रामस्थांच्या समस्या जाणून घेऊन त्या सोडविण्यासाठी किसन मोर्चाच्या वतीने शब्द देण्यात आला.

ग्राम परिक्रमा १२ फेब्रुवारी ते १२ मार्चदरम्यान किसन मोर्चाचे प्रदेशाध्यक्ष गणेश भेगडे यांच्या आदेशानुसार, प्रदेश उपाध्यक्ष सुनील गोगटे यांच्या मार्गदर्शनाने माजी आमदार सुरेश लाड यांच्या प्रमुख उपस्थितीत सावेळे जि. प. वार्ड साळोख येथून शुभारंभ झाला. ही यात्रा पुढे आंबोट येथे पार पडली. या वेळी भाजपचे पदाधिकारी व सर्व कार्यकर्त्यांनी उपस्थित राहून पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या स्वप्नातला भारत साकार करण्याचा संकल्प करून त्यांनी केलेल्या योजनांचा प्रचार, प्रसार आणि लाभ मिळवून देण्याकरिता आम्ही सर्व कटिबद्ध असल्याचे सांगितले.



साळोख येथे गोमाता, ट्रॅक्टर आणि नांगराचे पूजन प्रदेश उपाध्यक्ष किसान मोर्चा गोगटे आणि किसान मोर्चा जिल्हाध्यक्ष अतुल बडगुजर यांचे हस्ते पूजन करून शुभारंभ करण्यात आला. नागरिकांनी अनेक योजनांचा लाभ मिळत असल्याचे सांगून पंतप्रधान मोदीजींचे आभार मानले. काहींना लाभ मिळण्यात अडचणी येत आहेत, असे सांगितले. त्यांना भाजपच्या वतीने सर्व लाभ मिळवून देण्यासाठी आम्ही मदत करू, असे स्पष्ट केले.

किसान मोर्चा सरचिटणीस जनार्दन म्हसकर, उपाध्यक्ष हरिश्चंद्र मांडे, चिटणीस रवी देशमुख, सावेळे जि. प. अध्यक्ष विठ्ठल भागीत, विधानसभा संयोजक विनायक पवार, किसान मोर्चा तालुकाध्यक्ष शिरीष कदम, सरचिटणीस निलधे, अॅड. किसन पाटील, लोंगले, अनु. जाती मोर्चा तालुकाध्यक्ष गणेश गवई, युवा मोर्चा शहर अध्यक्ष सर्वेश गोगटे, उपाध्यक्ष मनीष गुप्ता, गायकर, भरत मालुसरे, तुषार देशमुख, योगेश घारे आदी उपस्थित होते.

## नांदगाव येथे भव्य महाशिवरात्र महोत्सवाचा शुभारंभ

**मुरुड : प्रतिनिधी**

श्रीगुरू सावर्डेकर महाराज संस्थापित रूद्ररेवा सेवा प्रतिष्ठान आळंदी देवाची अंतर्गत श्रीगुरूमाता सेवाश्रम नांदगाव येथे ७ ते १० मार्च या कालावधीत भव्य महाशिवरात्र महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे.

या कालावधीत आगमोक्त यज्ञ, शिवपूजन, भजन, प्रवचन, कीर्तन इत्यादी धार्मिक कार्यक्रम होतील, तसेच ८ मार्च महाशिवरात्र या दिवशी सकाळी श्रीगुरूमाता सेवाश्रम येथून भव्य दिव्य पालखी सोहळा श्री अमृतेश्वर मंदिर येथे जाईल व रात्री ११.३० वाजता सेवाश्रमात निशीथकालीन शिवपूजन झाल्यानंतर उपस्थित शिवभक्तांना उज्जैन श्री महाकालेश्वर ज्योतिर्लिंग येथे भस्मारतीच्या वेळेस सिद्ध केलेले रूद्राक्ष प्रसाद भेट देण्यात येतील. अधिक माहितीसाठी दिपेश पेरवे खारआंबोली (७९७२४४४९३९), रश्मी राम पाटील मजगाव (९४०३३१८७२०), नरेश पाटील नांदगाव (७७९८६१७४७७) यांच्याशी संपर्क साधावा.


**CHANGE IN NAME**

My name is appeared as **FARAH BEGUM** in the birth certificates of My Children **1) Ghazi Mohammed Saad Altamash Ahmed, 2) Ghazi Mohammed Hasan Altamash Ahmed**. As per Deed Pool Affidavit in front of Executive Magistrate, Panvel, I Declared that my full name is **SHAIKH FARAH BEGUM SHAIKH KALEEMUDDIN**. Resi. at Flat No. 23, E wing, Sai Leela building, Sai Udyan CHS Ltd., Sai Nagar, Panvel, Tal Panvel, Dist. Raigad 410 206

And **FARAH BEGUM** and **SHAIKH FARAH BEGUM SHAIKH KALEEMUDDIN** belong to me and is one and the same person.

**Sd/-**

**SHAIKH FARAH BEGUM SHAIKH KALEEMUDDIN**


# कर्जत वासराच्या खोंड्यात विकासकामांचे भूमिपूजन



**कर्जत : प्रतिनिधी**

तालुक्यातील वासराचा खोंडा म्हणून ओळखल्या जाणाऱ्या विभागात आमदार महेंद्र थोरवे यांनी सुमारे ३० कोटींची विकासकामे मंजूर केली होती. त्या विकासकामांचे भूमिपूजन करण्यात आले.

वासराच्या खोंड्यातील तमनाथ, बीड, अडिवली, चोची, मुगपे कोंडिवडे, कोंढाणे, नेवाळी, आवळस, पळसदरी, शिरसे आदी गावांमधील विकास कामांसाठी सुमारे ३० कोटी रुपयांचा निधी आमदार महेंद्र थोरवे यांनी उपलब्ध करून दिला होता. या वेळी जिल्हाप्रमुख संतोष भोईर, उपजिल्हाप्रमुख भाई गायकर आदींसह ग्रामस्थ उपस्थित होते. आमदार थोरवे यांनी, बीड विभागातून भरघोस मते मिळाली असल्याने माझा विजय झाला. या परिसरात विकासकामे करणे माझे कर्तव्य आहे. या भागात अनेक विकासकामे मी करणार आहे, असे स्पष्ट केले.


**अलिबाग नगरपरिषद, जि.रायगड**

**जाहीर निविदा सन २०२४**

मुख्याधिकारी अलिबाग नगरपरिषद अलिबाग खालील नमुद कामास पात्र इच्छुक निविदा धारकांनी जाहीर निविदा मागवित आहेत.

| अ. क्र. | कामाचे नांव | अंदाजपत्रकिय रक्कम | निविदा फॉर्म फी | इसारा रक्कम | निविदा फार्म मिळणेची अंतिम दिनांक व वेळ | सुरक्षा अनामत | सिलबंद निविदा सादर करणेची अंतिम दिनांक व वेळ |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | अलिबाग नगरपरिषदेच्या उर्दू शाळेच्या पहिल्या मजल्याचे विद्युतीकरण करणे. | ५६८३७३/- | १००० | ६०००/- | दि.२७/०२/२०२४ ते ४/०३/२०२४ वेळ वेळ दुपारी १.०० | होणाऱ्या बिलातून १० टक्के | दि.४/३/२०२४ रोजी संध्याकाळी ४.०० वाजे पर्यंत |

सदर बाबत अधिक माहिती कार्यालयीन वेळेत (सुटटीचे दिवस वगळता) विज विभागात मिळेल.
दिनांक : २६/०२/२०२४

सही/-
**प्रशासक तथा मुख्याधिकारी**
**अलिबाग नगरपरिषद**



**महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ**
(महाराष्ट्र शासन अंगिकृत)
**मुदतवाढ सूचना**

**ई निविदा सूचना क्र. १३०/२०२३-२०२४ (मुंबई) करीता**

दिनांक ३१/०१/२०२४ रोजी दैनिक नवाकाळ, मुंबई, दैनिक मिड डे , मुंबई, दैनिक फ्रिप्रेस जरनल, मुंबई, दैनिक प्रातःकाल,मुंबई, दैनिक नवभारत, मुंबई, दैनिक रामप्रहर, मुंबई या वृत्तपत्रामध्ये प्रसिद्ध झालेल्या वरील ई निविदा सूचनेतील खालील कामाकरीता ई निविदा महामंडळाच्या संकेतस्थळावर उपलब्धतेबाबत मुदतवाढ सूचना देण्यात येत आहे.

| अ. क्र. | कामाचे नांव | अंदाजित रक्कम रुपये |
|---|---|---|
| १. | विळे भागड औद्योगिक क्षेत्र.. विळेभागड औद्योगिक क्षेत्र पाणीपुरवठा योजनेच्या जलशुद्धीकरण केंद्रामधून जिल्हा रायगड, तालुका माणगाव मधील कडपे, कडपेवाडी, कांदळगाव, बांदलवाडी, निजामपूर, कोष्टे (खु) या गावांना पाणीपुरवठा करण्याकरीता मृदु पोलादी जलवाहिनीचा पुरवठा करणे. | ₹२८,०९,११,४३८.०० |

उपरोक्त कामांकरीता निविदा प्रपत्र दिनांक ०१/०३/२०२४ पर्यंत महामंडळाच्या https://www.midcindia.org या संकेतस्थळावर उपलब्ध असेल.

ज्या निविदा धारकांनी यापूर्वी आपली निविदा भरली असेल अथवा अपलोड केली असेल, त्यांनी निविदेमध्ये बदल करुन किंवा बदल न करता सदर निविदा पुन्हा भरणे आवश्यक आहे, याची कृपया नोंद घ्यावी, अशा कंत्राटदारांनी शुद्धिपत्रकानंतर जर निविदा पुन्हा भरली नाही अथवा अपलोड केली नाही तर त्यांचा देकार सदर स्पर्धात्मक निविदेतून आपोआप बाद होईल.

सदर निविदा सूचनेत इतर कोणताही बदल करण्यात आलेला नाही.



**महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ**
(महाराष्ट्र शासन अंगिकृत)
**शुद्धीपत्रक क्र २**

**ई निविदा सूचना क्र. १२८/२०२३-२०२४ (मुंबई) करीता**

दिनांक १२/०१/२०२४ रोजी दैनिक प्रहार, मुंबई, दैनिक मिड डे, मुंबई, दैनिक प्रातःकाल, मुंबई, दैनिक भास्कर, मुंबई, दैनिक कृषिवल, रायगड या वृत्तपत्रामध्ये प्रसिद्ध झालेल्या उपरोक्त ई निविदा सूचनेतील कामांकरीता शुद्धीपत्रक देण्यात येत आहे.

वरील ई निविदा सूचनेतील कामांकरीता कंत्राटदारांचे प्रश्न, कंत्राटदारांच्या मुद्यांचे निराकरण / महामंडळाचा खुलासा संकेतस्थळावर उपलब्धेबाबत मुदतवाढ सूचना देण्यात येत आहे.

| अ. क्र. | कामाचे नांव | अंदाजित रक्कम रुपये |
|---|---|---|
| १. | अतिरिक्त तळोजा औद्योगिक क्षेत्र.. तळोजा औद्योगिक क्षेत्रात चार पदरी पोहोच रस्ता बांधणे, अंतर्गत रस्ते, पाणीपुरवठा मुख्य जलवाहिनी टाकणे, जलवितरण वाहिन्या टाकणे, सांडपाणी संकलन वाहिन्या टाकणे, कासाडी नदीवरील पूल बांधणे, सामाईक सुविधा केंद्र बांधणे, विद्युत पायाभूत सुविधा पुरविणे, पथदिवे लावणे, अग्निशमन केंद्र बांधणे व ट्रक टर्मिनस इत्यादी पायाभूत सुविधा पुरविणे. | ₹ ३९०,१२,४३,३३०.०० |

इच्छुकांनी वरील कामाबाबत दिनांक २४/०३/२०२४ पूर्वी त्यांचे प्रश्न महामंडळाच्या संकेत स्थळावर नोंदवावेत. कंत्राटदारांच्या मुद्यांचे निराकरण /महामंडळाचा खुलासा दिनांक ०७/०३/२०२४ पासून महामंडळाच्या संकेत स्थळावर उपलब्ध होईल.

सदर निविदा सूचनेत इतर कोणताही बदल करण्यात आलेला नाही.

# भारताने चौथ्या सामन्यासह कसोटी मालिका जिंकली

## इंग्लंडची पुन्हा हार

**रांची : वृत्तसंस्था**

इंग्लंडविरुद्धच्या पाच सामन्यांच्या कसोटी मालिकेतील चौथा सामना भारताने पाच विकेट्सनी जिंकत मालिकेत ३–१ने अजेय आघाडी घेतली आहे. भारतीय संघाच्या या विजयात शुबमन गिल आणि ध्रुव जुरेलने नाबाद ७२ धावांची महत्त्वपूर्ण भागीदारी करून मोलाचे योगदान दिले. त्याचबरोबर रविचंद्रन अश्विननेही खारीचा वाटा उचलला.



या सामन्यात नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करताना इंग्लंड संघाने ३५३ धावा केल्या होत्या. प्रत्युत्तरात भारताचा पहिला डाव तिसऱ्या दिवशी ३०७ धावांवर गारद झाला. अशा प्रकारे इंग्लंडकडे पहिल्या डावाच्या आधारे ४६ धावांची आघाडी होती. यानंतर इंग्लंडने दुसऱ्या डावात १४५ धावा केल्या आणि भारतासमोर विजयासाठी १९२ धावांचे लक्ष्य ठेवले होते, जे भारतीय संघाने ६१ षटकांत पाच गडी गमावून पार केले. जुरेलच्या बॅटमधून विजयी धावा आल्या. त्याने दोन धावा घेत सामना जिंकवला. जुरेल ३९ धावांवर आणि शुबमन ५२ धावांवर नाबाद राहिला. याशिवाय कर्णधार रोहित शर्माने ५५ धावांची खेळी केली. त्याचबरोबर इंग्लंडकडून शोएब बशीरने पुन्हा एकदा कमाल करीत तीन विकेट्स घेतल्या.

चौथ्या दिवशी भारताने एकही विकेट न गमावता ४० धावांच्या पुढे खेळण्यास सुरुवात केली होती. भारताला ८४ धावांवर पहिला धक्का बसला, जेव्हा जो रूटने यशस्वी जैस्वालला जेम्स अँडरसनकरवी झेलबाद केले. त्याला ३७ धावा करता आल्या. त्यानंतर रोहित शर्माही कसोटी कारकिर्दीतील १७वे अर्धशतक झळकावून पॅव्हेलियनमध्ये परतला. त्याला टॉम हार्टलीने बेन फॉक्सच्या हाती झेलबाद केले. रोहितला ५५ धावा करता आल्या. रजत पाटीदार पुन्हा अपयशी ठरला आणि खाते न उघडताच पॅव्हेलियनमध्ये परतला. रवींद्र जडेजाही विशेष काही करू शकला नाही आणि चार धावा करून बाद झाला. हार्टलेने सलग दोन चेंडूंवर जडेजा आणि सर्फराझ खानला पॅव्हेलियनमध्ये पाठवले. सर्फराज खाते उघडू शकला नाही आणि झेलबाद झाला.

यानंतर जुरेल आणि शुबमनने शानदार फलंदाजी करीत भारताला विजय मिळवून दिला. दोघांनी स्ट्राईक रोटेट करीत भारताला विजयाकडे नेले. शुबमनने कसोटी कारकिर्दीतील सहावे अर्धशतक झळकावले. त्याचवेळी पहिल्या डावात ९० धावा केल्यानंतर ध्रुवने त्याच आत्मविश्वासाने दुसऱ्या डावाला सुरुवात करीत अनेक उत्कृष्ट फटके मारले.

# नमो चषक अंतर्गत वुमन्स वॉकेथॉनला उत्स्फूर्त प्रतिसाद

## ऐरोलीमध्ये हजारो महिलांचा सहभाग

**नवी मुंबई : बातमीदार**

नमो चषक २०२४अंतर्गत ऐरोली विधानसभा मतदारसंघाच्या वतीने आयोजित वुमन्स वॉकेथॉनला रविवारी (दि.२५) उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. ऐरोलीमधील हजारो महिलांनी वॉकेथॉनमध्ये उत्साही सहभाग नोंदवून निरोगी आयुष्यासाठी खेळ खेळण्याचा संदेश दिला.

नवी मुंबई भाजपचे जिल्हाध्यक्ष संदीप नाईक यांनी हिरवा कंदील दाखवून वॉकेथॉनचा शुभारंभ केला, तर माजी खासदार संजीव नाईक यांच्या उपस्थितीमध्ये या क्रीडा स्पर्धेची जल्लोषात सांगता झाली.

भाजपचे ऐरोली तालुका मंडळ अध्यक्ष तथा माजी नगरसेवक अशोक पाटील, माजी नगरसेविका संगीता पाटील व अन्य मान्यवर उपस्थित होते. सेक्टर १४ शिव राधा कृष्ण मंदिर येथून वॉकेथॉनचा शुभारंभ झाला. पारंपरिक वेशभूषेतही महिला सहभागी झाल्या होत्या. अडीच किमीची ही स्पर्धा सेक्टर १५ येथील चौकामध्ये झाली. विजेत्या स्पर्धकाला सोन्याची नथ भेट देण्यात आली. ११ पैठण्यांची सोडत खास आकर्षण होते. सहभागी सर्व महिलांना विशेष भेटवस्तू आणि प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले.




नवी मुंबईत नमो चषकासाठी एक लाखाहून अधिक नागरिकांची नवी मुंबईमध्ये नमो चषकाचे आयोजन विविध नोडमध्ये, विविध खेळ प्रकारांमध्ये आणि विविध वयोगटातल्या श्रेणीमध्ये करण्यात आल्याची माहिती या वेळी नवी मुंबई भाजप जिल्हाध्यक्ष संदीप नाईक यांनी दिली.

# दासगावमध्ये रंगला होडी शर्यतीचा थरार



**महाड : प्रतिनिधी**

वल्हव रे नाखवा वल्हव...वल्हव म्हणत होडीतील नाखव्याने भरतीचे पाणी आणि सुसाट्याचा वारा सहन करीत स्पर्धेतील आपले लक्ष गाठण्याचा प्रयत्न केला. गेली अनेक वर्षे खाडीपट्ट्यातील दासगावकर भोई समाज उदरनिर्वाह करण्यासाठी मासेमारी करून आपले कुटुंब चालवत आहेत. या भोई समाजातील तरुणांनी आयोजित केलेल्या होडी स्पर्धेत परिसरातील ग्रामस्थांनी हा रोमांचक थरार अनुभवला. स्पर्धेचे हे चौथे वर्ष आहे.

दासगावमधील श्री रंगावली संस्थेने आपली परंपरा जपण्याच्या हेतूने या स्पर्धेचे आयोजन केले होते. या स्पर्धेत दासगाव, महाड, दाभोळ, पेवे, पंदेरी, या गावातील तरुणांनी सहभाग घेतला होता. रविवारी (दि.२५) सकाळी होडी चालवण्याच्या या स्पर्धेला प्रारंभ झाला. गावातील तरुण आणि महिला वर्गाने वैविध्यपूर्ण वेशभूषा करीत स्पर्धकांना प्रोत्साहित केले. यामुळे दासगाव बंदर परिसरात एकच उत्साहाचे आणि आनंदाचे वातावरण निर्माण झाले होते. मुंबई आणि अन्य शहरात असलेल्या भोई समाजाच्या लोकांनीदेखील स्पर्धा पाहण्यासाठी हजेरी लावली होती.

सात होड्यांचा एक गट याप्रमाणे रेल्वे पुलाजवळून होड्याना सूचना देताच स्पर्धेला सुरवात होत होती. समोरून सुसाट्याचा वारा असतानादेखील हाताने होडी वल्हवत नेमून दिलेल्या लक्षापर्यंत नेली जात होती. होड्या वल्हवत नेणे हा उपस्थित प्रेक्षकांसाठी एक रोमांचक क्षण अनुभवता आला. संस्थेच्या सर्व सदस्यांनी या वेळी अथक मेहनत घेतली. सरपंच तपस्या जंगम यांनीदेखील उपस्थित सर्व स्पर्धकांना आणि विजेत्यांना शुभेच्छा दिल्या.

# रायगड जिल्हा महिला क्रिकेट संघ निवड चाचणी शुक्रवारी

**अलिबाग : प्रतिनिधी**

रायगड क्रिकेट असोसिएशनतर्फे रायगडचा महिला क्रिकेट संघ निवडण्यासाठी शुक्रवारी (दि.१) रिलायन्स कॉलनी लोधिवलीच्या मैदानावर निवड चाचणी शिबिर आयोजित करण्यात आले आहे.

जिल्ह्यातील रहिवासी महिला खेळाडूंनाच निवड चाचणीत भाग घेता येणार आहे. निवड चाचणीतील कामगिरीच्या आधारे रायगडचा महिला क्रिकेट संघ निवडला जाईल. निवड चाचणीसाठी येताना खेळाडूंनी स्वतःचे आधार कार्ड घेऊन येणे अनिवार्य आहे. क्रिकेटचा सफेद गणवेश परिधान करून खेळाडूंनी १ मार्च रोजी सकाळी ८.३० वाजता निवड चाचणीच्या ठिकाणी हजर राहावे. अधिक माहितीसाठी माहितीसाठी प्रशांत ओक (९८२२४२२६७६), संदीप पाटील (८३६९७८९३८५,९९२०५४८१८१) सचिन मते (०९८२२१ ५०३०३) यांच्याशी संपर्क साधावा, असे आवाहन असोसिएशनचे अध्यक्ष चंद्रकांत मते यांनी केले आहे.

# कोळी किंग चषक क्रिकेट स्पर्धेत विजय मार्तंड विजेता

**रेवदंडा : प्रतिनिधी**

रेवदंडा येथे हरेश्वर मैदानात विजय मार्तंड थेरोंडा क्रिकेट क्लबतर्फे कोळी किंग थेरोंडा खंडेराव पाडा आयोजित कोळी किंग चषक टेनिस बॉल मर्यादित षटकांचे क्रिकेट स्पर्धेत विजय मार्तंड थेरोंडा संघ प्रथम विजेता ठरला, तर द्वितीय क्रमांक जय बजरंग तळेखार, तृतीय क्रमांक हॅपी शॉप नांदगाव, चतुर्थ क्रमांक आप्पा इलेव्हन यांनी पटकाविले.



स्पर्धेत एकूण गाव टू गाव २४ संघ व आठ खुले संघ असे ३२ संघांनी सहभाग नोंदविला होता. स्पर्धेत उत्कृष्ट फलदांज यश जंगली, उत्कृष्ट गोलदांज विजय घाणेकर तर मालिकावीर अजय चौलकर यांची निवड करण्यात आली.

प्रथम क्रमांकास ५० हजार रोख व भव्य चषक, द्वितीय क्रमांकास २५ हजार व भव्य चषक, तृतीय क्रमांकास १० हजार व भव्य चषक, चतुर्थ क्रमांकास रूपये १० हजार व भव्य चषक तसेच मालिकावीरास सायकल, उत्कृष्ट फलदांज व गोलदांज यांना चषक बक्षिसे ठेवण्यात आली होती.

या स्पर्धेचा बक्षिस वितरण समारंभ शिवसेना अलिबाग तालुका प्रमुख अनंत गोंधळी, रेवदंडा सरपंच प्रफुल्ल मोरे, शिवसेना कार्यकर्ते प्रसाद गोंधळी, ग्रामपंचायत सदस्य दुशांत झावरे, शिवसेना कार्यकर्ते हर्षल घरत, तळेखार सरपंच विजय घाणेकर आदीच्या हस्ते झाला. या स्पर्धेचे समालोचन प्रदीप भोईर–नवखार व प्रितेश म्हात्रे–थेरोंडा यांनी केले, तर पंचाचे काम संतोष सुडकू यांनी सहकार्यासह पार पाडले.

# मुंबई इंडियन्सचा सलग दुसरा विजय

**बंगळूर** : अमेलिया केर हिची अष्टपैलू चमक, शबनिम इस्माईल हिची प्रभावी गोलंदाजी आणि कर्णधार हरमनप्रीत कौरच्या शानदार खेळीवर मुंबई इंडियन्स महिला संघाने गुजरात जायंट्स संघावर विजय मिळवला.

गुजरातकडून मुंबईसमोर १२७ धावांचे आव्हान उभे ठाकले होते. यास्तिका भाटीया व हेली मॅथ्यूज या सलामीवीरांना अपयशाचा सामना करावा लागला. नॅट सिव्हर व हरमनप्रीत कौर या अनुभवी जोडीने मुंबईचा डाव सावरण्याचा प्रयत्न केला. त्यानंतर हरमनप्रीत व अमेलिया केर या जोडीने मुंबईची अधिक पडझड होऊ नये, याची काळजी घेतली. सलामीच्या लढतीत अर्धशतकी खेळी करून मुंबईला विजय मिळवून देण्यात मोलाचा वाटा उचलणारी हरमनप्रीत याही लढतीत चमकली.

# आशियाई करंडकमध्ये तिरंदाजी १४ पदकांसह भारत पहिल्या स्थानी

**बगदाद (इराक) : वृत्तसंस्था**

भारतीय तिरंदाजांनी आशियाई करंडकात (लेग वन) पदकांची लयलूट केली. भारतीय तिरंदाजांनी लक्ष्याचा अचूक वेध घेत एकूण १४ पदकांवर मोहर उमटवली आणि पदकतालिकेत पहिल्या स्थानावर मुसंडी मारली. भारतीय तिरंदाजांनी नऊ सुवर्ण, चार रौप्य व एक ब्राँझपदकावर नाव कोरत आपले वर्चस्व प्रस्थापित केले. महाराष्ट्राच्या प्रथमेश जावकर याने या स्पर्धेमध्ये तीन सुवर्णपदकांची माळ आपल्या गळ्यात घातली हे विशेष.



भारतीय तिरंदाजांनी शनिवारी कंपाऊंड पुरुष सांघिक व मिश्र सांघिक या दोन्ही प्रकारात सुवर्णपदक पटकावले होते. तसेच कंपाऊंड महिला सांघिक प्रकारात रौप्यपदकावर समाधान मानावे लागले होते. रविवारी भारताच्या तिरंदाजांनी सहभागी सर्व प्रकारात सुवर्णपदकांवर हक्क सांगून निर्भेळ व घवघवीत यशाला गवसणी घातली.

पुरुषांच्या रिकर्व्ह प्रकारात धीरज बी. याने भारताच्याच तरुणदीप रायला पराभूत करीत सुवर्णपदक जिंकले. महिलांच्या रिकर्व्ह प्रकारात दीपिकाकुमारीने सिमरनजीत कौर हिला नमवत सुवर्णपदक जिंकले. बाळंतपणानंतर दीपिकाकुमारीने झोकात पुनरागमन केले. या दोन्ही प्रकारात भारतीय खेळाडूंना रौप्यपदके मिळाली.

या स्पर्धेमध्ये भारताचे प्रतिनिधित्व करणाऱ्या प्रथमेश जावकर, प्रवीण जाधव व अदिती स्वामी या तीन खेळाडूंनी उल्लेखनीय कामगिरी केली. प्रथमेश जावकर याने अदिती स्वामी हिच्या साथीने कंपाऊंड मिश्र प्रकारात सुवर्णपदक जिंकले, तसेच कंपाऊंड पुरुषांच्या सांघिक प्रकारातही सुवर्णपदक पटकावले.

### छत्रपती शिवाजी महाराज चषक कबड्डी स्पर्धा

# नाशिकचे दोन्ही संघ साखळी सामन्यात विजयी

**ठाणे : प्रतिनिधी**

नाशिकच्या महिला व पुरुष या दोन्ही संघानी २२व्या छत्रपती शिवाजी महाराज चषक कबड्डी स्पर्धेत पहिल्या साखळी विजयाची नोंद केली. परबवाडी येथील स्व. धर्मवीर आनंद दिघे क्रीडानगरीत सुरू असलेल्या दुसऱ्या दिवशीच्या महिलांच्या ड गटात नाशिकने नागपूर ग्रामीणचा ३७–२० असा पराभव केला. पूर्वार्धात चुरशीने खेळलेल्या या सामन्यात पहिला लोण देत १८–१२ अशी आघाडी घेतली.

उत्तरार्धात आणखी एक लोण देत सामना आपल्या बाजूने झुकविली. नाशिकची विदिशा सोनार या विजयाची शिल्पकार ठरली. नागपूरची सोनाली राठोड चमकली. नाशिकच्या पुरुष संघाने ब गटात वाशिमचा ६७–२५ असा धुव्वा उडविला. पहिल्या डावात ३ लोण देत ३८–१२ अशी आघाडी घेणाऱ्या नाशिकने तोच जोश कायम राखत आणखी २लोण देत सामना एकतर्फी केला. पवन भोर, ईश्वर पठाडे यांच्या चढाया व सनी मते याच्या भक्कम बचावाला जाते. यवतमाळचे आयुष राठोड, राहुल भैसर बरे खेळले.





मुंबई शहराला संमिश्र यश लाभले. अ गटात मुंबईच्या पुरुष संघाने सांगलीचा ४२–२९ असा पराभव करीत साखळीतील सलग दुसऱ्या विजयाची नोंद केली. प्रणव राणे, विनोद अत्याळकर यांच्या चढाया व ओमकार मोरेचा बचाव या विजयात महत्त्वाचा ठरला. सांगलीकडून युवराज पाटील, अनिकेत जंगम यांनी बऱ्यापैकी लढत दिली. मुंबई उपनगरने मुंबई शहराला ४१– ३९असे चकविले. पहिला लोण देत उपनगरने विश्रांतीला २१–१५अशी आघाडी घेतली. विश्रांतीनंतर सूर सापडलेल्या मुंबई शहरने लोण देत ही आघाडी कमी केली, पण शेवटी उपनगरने बाजी मारली. हरजित संधू, सायली जाधव उपनगरकडून, तर पूजा यादव, पौर्णिमा जेधे मुंबईकडून उत्कृष्ट खेळल्या.




दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. –मुख्य संपादक

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया अॅण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे–बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राइड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले**. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०–२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२–२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com